# संपादकीय

**ज्ञानपीठ पुरस्काराचे तिसरे गुजराती मानकरी**

भारतातील साहित्यिकांसाठी सर्वोच्च सन्मान म्हणजे ज्ञानपीठ पुरस्कार. यंदा तो गुजराती कवी राजेंद्र शहा यांना जाहीर झाला आणि उमाशंकर जोशी (१९६१), पन्नालाल पटेल (१९८५) यांच्यानंतरचे ते तिसरे गुजराती ज्ञानपीठ विजेते ठरले. नव्वदाव्या वर्षी त्यांना हा पुरस्कार मिळाला. त्यामुळे त्या पुरस्काराचे श्रेय त्यांच्या साहित्याबरोबर त्यांच्या वयालाही द्यायला हवे. राजेंद्रकुमार केशवलाल शहा हे खरे तर व्यापारी कुटुंबातील, ते व्यापारातच पडायचे. पण मॅट्रिकनंतर ते मुंबईच्या विल्सन कॉलेजमध्ये आले. पुढे बडोद्याच्या एम एस विद्यापीठातून पदवीधर झाले. विल्सन कॉलेजमध्ये असतानाच त्यांच्या कविता कॉलेजच्या नियतकालिकात छापून आल्या. पुढे शिक्षक म्हणूनही काही काळ ते काम करीत राहिले. प्रिंटिंग प्रेसही त्यांनी चालवला आणि व्यापारही केला. तरीही काव्यलेखन अखंड चालू राहिले. एकावन्न साली वयाच्या चाळिशीत त्यांचा पहिला काव्यसंग्रह प्रकाशित झाला. गुजरातीप्रमाणेच भोजपूरी भाषेतही त्यांनी लेखन केले. जयदेवाचे गीतगोविंद, विद्यापतीच्या रचना, बुद्धदेव बोस यांच्या काव्यरचना यांचे गुजरातीत अनुवाद केले. १९५६ साली त्यांचा ध्वनी हा संग्रह प्रसिद्ध झाला. त्या संग्रहाने त्यांची स्वतंत्र प्रतिमा गुजराती साहित्य क्षेत्रात स्थिरावली. राजेंद्र शहा आणि ध्वनी असे समीकरण जनमानसात रुजले. सुधारक युग (नर्मद, दलपती या कवींचे लेखनपर्व), पंडित युग, (कान्त, न्हानालाल, बळवंतराय ठाकोर) आणि गांधीयुग (उमाशंकर जोशी) असे तीन टप्पे गुजराती काव्यात मानले जात. उमाशंकर यांचे अनुकरण करणाऱ्या इतर लेखकांचे गांधीयुगीन काव्य पुढे सामाजिक प्रबोधनाच्या व प्रचारकी उपदेशाच्या अतिरेकामुळे बोथट बटबटीत होत गेले. त्याच सुमारास रवींद्रनाथ टागोर यांच्या सौंदर्यासक्त, निसर्गप्रेमी, अध्यात्मप्रवण काव्याच्या प्रभावाखाली लेखन करणारे कृष्णलाल श्रीधराणी, प्रल्हाद पारेख यांचे काव्य रसिकांचे लक्ष वेधून घेणारे ठरले. राजेंद्र शहा, रवींद्रकाव्याच्या प्रभावाखालीच होते. गांधीवाद व साम्यवाद या दोहोंपासूनही ते अलगच राहिले आणि छंदोबद्ध, वृत्तबद्ध, काव्य व गीत लेखनाकडेच त्यांचा ओढा राहिला.

ते कॉलेजमधून पस्तीसच्या सुमाराला बाहेर पडले; पण त्यावेळच्या स्वातंत्र्य आंदोलनात झोकून देण्याचा मोह त्यांनी टाळला. व्यवसाय व कुटुंबाच्या इच्छा यांना महत्त्व दिले. स्वातंत्र्याच्या आंदोलनापासून ते दूरच राहिले. त्यांच्या काव्यात बेचाळीसच्या चले जाव चळवळीचे, दुसऱ्या महायुद्धाचे, फाळणीचे उल्लेखही येत नाहीत. याचे आश्चर्य त्यामुळे वाटायला नको. त्यांचे काव्य हे प्रेम, प्रणय, निसर्ग, कृषिसंस्कृती, अध्यात्म, यातच भिरभिरत राहिले. लोकगीते, ग्रामीण भाषा व प्रतिमा यांचे प्राबल्य त्यांच्या काव्यात दिसते. सुनीतरचनांवर त्यांचा जोर आहे.

राजेंद्र शहा यांना अनेक पुरस्कार वेळोवेळी मिळालेले आहेत. रणजित राय सुवर्ण पदक त्यांना १९५६ मध्ये मिळाले. साहित्य अकादमी पुरस्कार १९६४ साली (वयाच्या ५२ व्या वर्षी)



मिळाला. कवी न्हानालाल पुरस्कार (१९६८), कवी नर्मद चषक (१९७७), गुजरातीतील साहित्य परिषद पुरस्कार (१९८०), भारतीय भाषा परिषद - कलकत्ता पुरस्कार (१९८५) गुजराती साहित्य अकादमी पुरस्कार (१९९३) वगैरे सन्मान राजेंद्र शहा यांना या आधी लाभलेले आहेत. ज्ञानपीठाचे उमेदवार म्हणून मात्र त्यांचे नाव अपघातानेच पुढे आले. आणि नशिबाने साथ दिल्याने त्या पुरस्काराचा लाभही त्यांना झाला. त्यांच्या आशावादी जीवनदृष्टीला व स्वभाव प्रवृत्तीला एका परीने हा भरघोस प्रतिसाद मिळाला असे म्हणता येईल.

कवी मंगेश पाडगावकर यांनी राजेंद्र शहा यांच्या एका कवितेचा अनुवाद मराठीत केला आहे. त्यात त्यांनी मूळ गुजराती संस्कृतप्रचुर भाषा शक्यतो कायम ठेवली आहे. एक झलक म्हणून 'श्रावणातल्या मध्यान्ही' मधील या चार ओळी पहा.

''मानस सरजल श्वेत हिमोज्ज्वल मम नेत्रांना दिसते<br>
आणि चांदणे चंद्रमौलिचे निळ्या नभातुन खुलते<br>
कैलासाचे पुनीत दर्शन ! धन्य असे हे पर्व !<br>
स्वप्न, जागृती, तुर्या नाही तरीही आहे सर्व.''

श्रावणातल्या मध्यान्ही एका इवल्याशा गावाप्रमाणे त्यांनाही जाणवते की, मनाच्या अत्यंत विश्रब्ध अवस्थेत आपण तल्लीन, तृप्त आहोत असे वर्णन त्यांनी केले आहे.

'इवलेसे हे गाव विसावा घेते थकुनी श्रमांनी<br>
असे कुणी बसलेले, कोणी कामाने थकलेले<br>
मौन अपार भरुनिया नेत्री हे झोपी गेलेले<br>
पहा कसा हा समुद्र येथे भरत्यांमधला दोन<br>
काठ सोडूनी झाला आहे स्वत:मध्येच निमग्न<br>
काहीही कर्तव्य न शिल्लक आता मजला उरले<br>
हर्ष शोक मज नुरे चित्त मन निश्चिंत अगदी झाले.'

गुजराती साहित्याचा व्याप आपल्या मराठीच्या मानाने फार सीमित आहे. तरीही मराठीपेक्षा अधिक ज्ञानपीठ पुरस्कार गुजरातीने पटकावले आहेत. मराठी साहित्याची उपेक्षा भारतीय व जागतिक पातळीवर सातत्याने होत राहिलेली आहे - हे खरेच आहे. आपले उत्तमोत्तम साहित्य अन्य भाषकांपर्यंत पोचवण्यात आपण कुठेतरी कमी पडत आहोत हाच याचा अर्थ! त्या दिशेने आपण काही करेपर्यंत हे असेच चालायचे.

**'अर्वाचीन मराठी वाङ्मयसेवक कोशकार खानोलकर'**

चरित्रकार, कोशकार, गं. दे. खानोलकर यांच्या जन्मशताब्दीचे हे वर्ष, अर्वाचीन मराठी वाङ्मयसेवक हा प्रकल्प त्यांनी १९३१ पासून राबवला. १९६७ पर्यंत त्याचे सात खंड प्रकाशित केले. मराठी ग्रंथकार विभाग पहिला इ. स. १०५० ते १८५७ हा परिचयकोश त्यांनी तयार केला. पुढच्या विभागाचीही त्यांनी बरीच तयार केली. नुकतेच दोन खंडात त्यांच्या 'वाङ्मय सेवकाची' नवी आवृत्ती निघाली आहे. हे त्यांचे एकहाती झालेले कार्य फार मोलाचे आहे. संकलन, संपादन, लेखन, संशोधन या क्षेत्रात त्यांचे योगदान महत्वाचे आहे हे या जन्मशताब्दीच्या निमित्ताने आजच्या मराठी अभ्यासकांच्या लक्षात येण्याची गरज आहे.

खानोलकरांचा जन्म वेंगुर्ले तालुक्यातील खानोली येथे झाला. शिक्षण सावंतवाडी व मालवण येथे झाले. पण त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला खरी दिशा मिळाली ती शांतिनिकेतनमधील वास्तव्यात आणि गुरुदेव टागोरांच्या सानिध्यात. 'विश्वभारती' च्या रूपाने रवींद्रनाथ विश्वकुटुंबाचे जे भव्य स्वप्न बघत होते, त्या स्वप्नाची भूल खानोलकरांना पडली, परंतु आपले कार्यक्षेत्र निवडताना त्यांनी मराठी साहित्य हेच केंद्रस्थानी ठेवले. रवींद्रनाथ टागोरांचे चरित्र त्यांनी १९६१ साली लिहिले आणि त्यांच्यातील माणसाचा तसेच विश्वमानवाचा अनोखा परिचय करून दिला. चरित्र लेखनाची खानोलकरांना आवड होती. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर (१९२७), प्रो. विष्णू गोविंद विजापूरकर, लाला लजपतराय, इतिहास संशोधक राजवाडे, माधव ज्यूलियन (१९५१), वगैरे चरित्रे त्यांनी लिहिली. बाळकृष्ण गणेश ढवळे स्मृतिग्रंथ, धनंजय कीर षष्ट्यब्दी गौरव ग्रंथ, डॉ. श्री. व्यं. केतकर लेखसंग्रहाचे संपादन, समग्र कोल्हटकरचे संपादन (वि. स. खांडेकर व ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या सहकार्याने), विश्रब्ध शारदा या पत्रसंग्रहासाठी टीपांचे लेखन- वगैरे त्यांचे कार्यही त्यांच्या चौफेर व्यासंगावर प्रकाश टाकतात.

आम्ही त्यांच्या स्मृतीला अभिवादन करतो.

**चित्रकार हुसेन यांचा ८ किलो वजनाचा ग्रंथ**

चित्रकार एम. एफ. हुसेन यांनी अनवाणी वाट काढत पंढरपूरच्या थिएटरात सिनेमाचे बोर्ड रंगवण्यापासून सुरुवात करून आंतरराष्ट्रीय ख्यातिप्राप्त चित्रकारापर्यंतचा प्रवास 'गजगामिनी' सारखे फिल्मी टप्पे घेत पूर्ण करून अनेक देशीपरदेशी सन्मान प्राप्त केले. अनेक प्रयोग केले. केवळ चित्रकलेतच नव्हे तर चित्रपट क्षेत्रातही ! कधी कधी तर स्टंट व सवंग असेही प्रयोग त्यांनी केले आणि भल्याभल्यांना चक्रावून टाकले. आपला ८८ वा वाढदिवस ते कलकत्ता, दिल्ली, मुंबई वगैरे ठिकाणी दिनांक १७ सप्टेंबरला साजरा करणार आहेत. '८८ हुसेन्स इन ऑइल' नावाने ८ किलो वजनाचा एक वजनदार ग्रंथ ते प्रसिद्ध करणार आहेत. गेल्या वर्षात वेगवेगळ्या शहरी प्रदर्शने भरवून त्यांनी त्यात आपली ताजी तैलचित्रे प्रदर्शित केली होती. त्यापैकी निवडक चित्रे उत्तम प्रकारे मुद्रित करून या ग्रंथरूपात रसिकांना सादर करण्याची कल्पना त्यांच्या वाढदिवसाचे वेगळेपण दर्शविणारी आहे हे नक्कीच ! या ग्रंथाची किंमत १२ हजार रुपये असेल, परंतु ८८ व्या वाढदिवसाच्या निमित्ताने ८ हजार ८०८ रुपयांना तो उपलब्ध असणार आहे; याचे प्रकाशन मुंबई येथील पंडोल आर्ट गॅलरी, कलकत्ता येथील गॅलरी ८८, दिल्ली येथील वेदेहरा आर्ट गॅलरी या तीन संस्थांच्या वतीने होणार आहे. चित्रकार हुसेन यांनी गेल्या ४० वर्षात तैलचित्र केलेले नव्हते. ॲक्रिलिकवर जास्त जोर होता. त्यामुळे या तैलचित्रांना वेगळे मोल व महत्त्व प्राप्त झालेले आहे. मध्यंतरी त्यांचे एक चित्र एक कोटीपेक्षाही जास्त किंमतीला विकले गेले - ते उगीच नाही. पुरुष, स्त्रिया, झाडे, पशुपक्षी यांच्या माध्यमातून स्वत:चाच आपला शोध चालू आहे असे ते मानतात आणि आपल्याला जाणवणारे आत्म-रूप आपण इतर रसिकांपर्यंत पोचविण्यासाठी प्रयत्नशील असतो असे ते म्हणतात. या ग्रंथामध्ये छापण्यात आलेल्या चित्रांची मूळ चित्रे कलकत्ता येथे प्रदर्शनात ठेवण्यात येणार आहेत आणि पुढे ही प्रदर्शने अन्य शहरीही नेण्यात येणार आहेत.

चित्रकार हुसेन यांना आमच्या वाढदिवसाच्या शुभेच्छा.



## साहित्यवार्ता

**❑नानासाहेब जोशी यांची जन्मशताब्दी**

पन्नास-साठच्या दशकामध्ये महाराष्ट्रात प्रकाशन व मुद्रण व्यवसायात सर्वतोमुखी झालेले एक अग्रणी नाव म्हणजे जोशी-लोखंडे प्रकाशन व त्यांनी चालविलेले प्रतिभा मुद्रणालय. कालौघात या संस्थांनी वेगळे वळण घेतले. या संस्थांचे अध्वर्यू देविदास श्रीधर उर्फ नानासाहेब जोशी यांची जन्मशताब्दी आहे.

१९२६ मध्ये नगरमध्ये प्राथमिक शिक्षक असताना 'सुलभ शास्त्रीय विज्ञान' पुस्तक नानासाहेबांनी लिहिले. त्या पुस्तकाला तत्कालिन मराठी बुक कमिटीने संदर्भ-पुस्तक म्हणून मान्यता दिली. तेव्हा द. भ. उर्फ अण्णासाहेब लोखंडे यांच्या समवेत मुद्रण व प्रकाशनक्षेत्रात त्यांनी झेप घेतली. त्यांच्या धर्मपत्नी सौ. लक्ष्मीबाई जोशी यांचा या व्यवसायात सिंहाचा वाटा होता.

१९४० ते १९६० या कालखंडात महाराष्ट्रात जे अनेक विचारप्रवाह निर्माण झाले, ते सामान्य लोकांपर्यंत पोचविण्यासाठी 'महाराष्ट्रातील वाङ्मयीन प्रवाह' आणि 'महाराष्ट्रातील विचारप्रवाह' या दोन साहित्यिक व वैचारिक ग्रंथमालांची निर्मिती केली.

१९५६ च्या ऑक्टोबरमध्ये याज्ञवल्क्य आश्रमात 'महाराष्ट्र दर्शन' ही व्याख्यानमाला झाली. ती ऐकल्यावर नानासाहेबांनी 'महाराष्ट्र जीवन' या ग्रंथाची कल्पना मांडली. गं. बा. सरदार यांनी त्याच्या संपादकत्वाची जबाबदारी स्वीकारली. दि. के. बेडेकर, लक्ष्मणशास्त्री जोशी, पु. ग. सहस्त्रबुद्धे, इरावती कर्वे, दुर्गा भागवत, ग. प्र. प्रधान इ. मान्यवरांनी महाराष्ट्रातील ऐतिहासिक परंपरा, धार्मिक संस्था व संप्रदाय, तत्त्वमीमांसा, समाजकारण, राजकारण, अर्थकारण, शिक्षण, संशोधन, लोकभाषा व लोकसाहित्य, वाङ्मय, कला, आधुनिक महाराष्ट्राचे शंभर शिल्पकार अशा विषयांवर लेखन केले. धनंजयराव गाडगीळांनी 'भारत व महाराष्ट्र' या ५० पानी लेखाने ग्रंथारंभ केला. डॉ. चिंतामणराव देशमुखांच्या अध्यक्षतेखाली प्रेस कॉपीचे पूजन केले. महाराष्ट्र राज्य निर्मितीचे (१ मे १९६०) औचित्य साधून तत्कालिन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली 'महाराष्ट्र जीवन' या द्विखंडीय ११०० पृष्ठांच्या ग्रंथांचे प्रकाशन झाले.

नवमहाराष्ट्रातील विचारप्रवाहांतर्गत त्यांची उल्लेखनीय प्रकाशने अशी - अस्पृश्यांचा मुक्तिसंग्राम, औद्योगिक विकास, कामगार संघटना, महाराष्ट्रातील आदिवासी आणि त्यांचे प्रश्न, प्रजासमाजवादी पक्ष - कार्य आणि भवितव्य, महाराष्ट्रातील स्त्रीजीवन-विकास इ. स्वातंत्र्योत्तर काळात निर्माण झालेल्या व स्फोटक बनलेल्या राष्ट्रीय प्रश्नांची उकल आणि त्यासाठी जनजागरण हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून पुन्हा एकदा गं. बा. सरदार यांच्या

संपादनाखाली नाणावलेल्या, अनुभवी विचारवंतांना त्यांनी एकत्र आणले आणि 'संक्रमण काळाचे आव्हान' या ग्रंथाचे प्रकाशन १९६६ मध्ये केले.

१९२७ ते १९६७ या कालखंडात जागतिक व प्रादेशिक पातळीवरील घटना-जागतिक मंदी, दुसरे महायुद्ध, पानशेतचा पूर इ. पचवून त्यांनी आपले कार्यक्षेत्र यशस्वीपणे, चढत्या श्रेणीने जोपासले. वक्तशीरपणा, नियमितपणा, समयसूचकता, प्रामाणिकपणा, लोकसंग्रह, प्रयत्नवाद व कार्यावरील निष्ठा या त्यांच्या गुणसंपदेमुळे ! जोशी-लोखंडे प्रकाशनाची सुमारे ४००० पुस्तके प्रकाशित झाली.

- डॉ. वृषाली देवस्थळी

### ❒ मुंबई विद्यापीठ नाट्यकला विभागाच्या संचालकपदी वामन केंद्रे

मुंबई विद्यापीठात 'मास्टर ऑफ थिएटर आर्ट' हा दोन वर्षांचा पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरू होत आहे. या विभागाचे संचालक म्हणून प्रसिद्ध नाट्य दिग्दर्शक वामन केंद्रे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

डॉ. स्नेहलता देशमुख कुलगुरू असताना त्यांनी या विभागासाठी हालचाली केल्या होत्या. त्यानंतर डॉ. मुणगेकर यांनी या कामास अग्रक्रम दिला. डॉ. जब्बार पटेल, प्रा. कमलाकर सोनटक्के, वामन केंद्रे, जयंत पवार यांच्या समितीने 'थिएटर आर्ट' च्या दोन वर्षांच्या अभ्यासक्रमाची रूपरेषा ठरवली. दिल्लीच्या राष्ट्रीय नाट्य विद्यालयाच्या धर्तीवर या अभ्यासक्रमाची आखणी करण्यात आली आहे. ६० टक्के प्रात्यक्षिक आणि ४० टक्के सैद्धांतिक असे त्याचे स्वरूप असणार आहे. जागतिक रंगभूमी, भारतीय रंगभूमी (यात मराठी रंगभूमी हा विशेष विभाग असेल) यांवरील अभिजात आणि आधुनिक नाटके तसेच भारतासह विविध देशांतील लोकरंगभूमी यांचा सांगोपांग अभ्यास यात अभिप्रेत आहे. नाट्येतिहास, नाट्यवाङ्मय, रंगभूमी तंत्र व कौशल्य, नाट्य दिग्दर्शन, अभिनय यासह रंगभूमीच्या सर्व घटकांचा अभ्यास दोन वर्षांत करता येईल तसेच भरतमुनी, स्टानिस्लावस्की, मेयरहोल्ड, ब्रेख्त, पीटर ब्रुक अशा दिग्गज गुरूंच्या नाट्यतंत्रांचा आणि तत्त्वज्ञानांचा अभ्यास करता येईल. हे शिकवताना त्यांना सतत छोटी नाटके वर्षाला दोन मोठी नाटके सादर करावी लागतील. निर्मिती प्रक्रियेत नाटकाची विविध अंगे हाताळावी लागतील.

या अभ्यासक्रमासाठी कुठल्याही शाखेत पदवी परीक्षेत किमान ५० टक्के गुण (राखीव जागांच्या विद्यार्थ्यांना ४५ टक्के) आणि मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषा अवगत असणे गरजेचे आहे. नाट्यशास्त्राच्या विद्यार्थ्यास किंवा परफॉर्मिंग आर्टचा प्रत्यक्ष अनुभव असणाऱ्यास प्राधान्य दिले जाईल. कोऱ्या कागदावर अर्जदाराने आपले नाव, पत्ता, जन्मतारीख, कायम स्वरूपी पत्ता, राष्ट्रीयत्व, जात, पदवी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या महाविद्यालयाचे व विद्यापीठाचे नाव, पदवीचा विषय, गुणांची टक्केवारी, नाट्यकलेतील व अन्य कलांतील अनुभव या तपशिलासह रजिस्ट्रार, मुंबई विद्यापीठ, पोस्ट ग्रॅज्युएट सेक्शन, रुम नं. १३०, फोर्ट, मुंबई-४०० ०३२ या पत्त्यावर अर्ज पाठवावयाचा आहे.

### ❒ सुधीर फडके यांचा पहिला स्मृतिदिन!

अनेकानेक अविस्मरणीय संगीतरचना देऊन गेलेले संगीतकार सुधीर फडके तथा बाबूजी



म्हणजे भारतीय चित्रपटसंगीत क्षेत्रातील अनमोल कोहिनूरच होते, असे उद्गार केंद्रीय पेट्रोलियममंत्री राम नाईक यांनी काढले.

बाबूजी शरीराने आपल्यातून निघून गेले, त्याला २९ जुलैला एक वर्ष पूर्ण झाले. सुधीर, पत्नी ललिता व पुत्र श्रीधर यांच्या नावातील आद्याक्षरे घेऊन स्थापन झालेल्या सुलश्री प्रतिष्ठानच्या सहकार्याने प्रभात चित्र मंडळाने दादरला 'स्वरतीर्थ सुधीर फडके' हा सांगीतिक कार्यक्रम आयोजिला होता.

बाबूजींच्या देशविदेशातील चाहत्यांच्या श्रद्धांजलीचे 'जुळल्या सगळ्या त्या आठवणी' या सुलश्री प्रतिष्ठानच्या पुस्तकाचे तसेच राजहंस प्रकाशनाने काढलेल्या 'जगाच्या पाठीवर' या अपूर्ण आत्मकथनाचे प्रकाशनही झाले. हिमानी सावरकर व आनंद हर्डीकर यांनी या पुस्तकांचा परिचय करून दिला.

श्रीमती ललिता फडके यांनाही प्रारंभी प्रभात चित्र मंडळाचे अध्यक्ष-नगरपाल किरण शांताराम यांनी गौरवले. स्मिता तळवलकर यांनी या स्मृतीसोहळ्याचे सूत्रसंचालन केले.

सुलश्री प्रतिष्ठानने बाबूजींनी स्वरबद्ध केलेली २१ गाणी सादर करून त्यांना स्वरांजली वाहिली. अदिती जोगळेकर व मिलिंद जोशी यांनी सूत्रसंचालन केलेल्या या कार्यक्रमाचा कळस बाबूजींचा वारसा पुढे चालवणारे सुपुत्र श्रीधर फडके यांच्या गायनाने झाला.

### ❒ कलाकाराने लिहिलेले अनुभव वेगळा आनंद देणारे : अत्रे

कलाकाराच्या अनुभवाचे, चिंतनाचे लेखन कोणी दुसऱ्याने केल्यास त्यातील नेमकेपणा कमी होण्याची भीती असते, तसेच ते बोथट ठरण्याचीही शक्यता असते; मात्र स्वत: कलाकाराने पुस्तकाची निर्मिती केली तर तो आनंद काही निराळाच असतो, असे मत ज्येष्ठ गायिका डॉ. प्रभा अत्रे यांनी व्यक्त केले.

ज्येष्ठ बासरीवादक पं. अरविंद गजेंद्रगडकर यांनी लिहिलेल्या आणि 'उन्मेष प्रकाशन'ने प्रकाशित केलेल्या 'असे सूर अशी माणसं' या पुस्तकाचे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे होते. कवी गंगाधर महांबरे, 'अंतर्नाद'चे संपादक भानू काळे उपस्थित होते.

पं. गजेंद्रगडकर यांनी पुस्तक लिहिण्यामागची भूमिका स्पष्ट केली. मेधा राजहंस यांनी स्वागत केले आणि आभार मानले. मंजिरी धामणकर यांनी सूत्रसंचालन केले.

दक्षिणी संगीत आणि हिंदुस्थानी संगीतातले समान राग, त्याच रागांवर आधारित सिनेगीते आणि पॉप संगीत अशा वैविध्यपूर्ण संगीताचा अनुभव देणारा 'स्वरसंगम' हा कार्यक्रमही या वेळी झाला. श्रीमती राजलक्ष्मी (कर्नाटकी व्हायोलिन), गिरीश महामुनी (तबला), निखिल महामुनी (तालवाद्ये) आणि स्वत: पं. गजेंद्रगडकर (बासरी) यांचा यात सहभाग होता.

### ❒ निसर्गाची भाषा लेखकाने प्रकट करावी : ग्रेस

"निसर्गाला रूप असते; पण स्वत:ची भाषा नसते. त्यामुळे लेखकानेच निसर्गाची भाषा जाणून घेऊन ती प्रकट करायची असते," असे ज्येष्ठ कवी ग्रेस यांनी पुणे येथे सांगितले.

करोला पब्लिकेशनसाठी श्रीकांत इंगळहळ्ळीकर यांनी लिहिलेल्या 'आसमंत' या पुस्तकाचे

प्रकाशन ग्रेस यांनी केले. 'साप्ताहिक सकाळ' चे संपादक सदा डुंबरे प्रमुख पाहुणे होते. 'वनवाटांचे प्रवासी' मारुती चितमपल्ली अध्यक्षस्थानी होते.

कला ही जीवनाची पुनर्निमिती करते, असे सांगून ग्रेस म्हणाले, ''निसर्ग स्वायत्त आहे; पण सार्वभौम नाही. सार्वभौम असते फक्त सौंदर्यसत्ता. निसर्गाला स्वत:चा स्वतंत्र आविष्कार करता येत नाही. कलावंताच्या मनोगतातून प्रतिमांचे कल्लोळ उठतात आणि तो त्याचे निसर्गावर आरोपण करतो. वर्णनाचा प्रदेश संपतो, तेथे अनुभूतीचा प्रवेश होतो आणि तो प्रदेश संपल्यावर सौंदर्यसत्ता सुरू होते. व्यंकटेश माडगूळकरांच्या 'बनगरवाडी'त किंवा मर्ढेकरांच्या 'गंगेमधी गगन वितळते' यात ही सौंदर्यसत्ता दिसते.''

निसर्गनिरीक्षण हा आपला छंद नाही, तर ध्यास आहे, असे इंगळहळ्ळीकर यांनी सांगितले. विवेक देशपांडे व चंद्रकांत काळे यांनी परिचय करून दिला. अरुण नूलकर यांनी सूत्रसंचालन केले.

### ❐ 'वाचकांनी स्वतःला आवडेल तेच वाचावे'

''पुस्तकाला बाजारपेठेतील वस्तूचे स्वरूप प्राप्त झाले आहे. यामुळे वाचकांवर अनेक अप्रत्यक्ष दबाव पडत असतात. या दबावांपासून दूर राहत वाचकांनी स्वत:ला आवडेल तेच वाचले पाहिजे,'' असे प्रतिपादन प्रसिद्ध लेखिका शशी देशपांडे यांनी केले.

'मिळून साऱ्याजणी' या मासिकाच्या 'गौरी देशपांडे विशेषांका'चे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले. सामाजिक कार्यकर्त्या सुनीती सु. र. यांना या वेळी 'कै. पु. बा. आणि ताराबाई साठे पारितोषिक' प्रदान करण्यात आले.

श्रीमती देशपांडे म्हणाल्या, ''कोणते लिखाण चांगले, यापेक्षा कोणता लेखक किती पैसे मिळवत आहे, कोणते पुस्तक छापल्यामुळे प्रकाशकाला फायदा होणार आहे, या बाबी सध्या अधिक महत्त्वाच्या ठरत आहेत. वृत्तपत्रांतून समीक्षा प्रसिद्ध केली जाते. अशा प्रकारे वातावरण-निर्मितीद्वारे लेखकाचे नाव वाचकांच्या अंगवळणी पाडले जाते. त्यामुळे चांगले पुस्तक व अधिक खपाचे पुस्तक यात विसंगती दिसून येते आहे. या सर्व प्रकाराने आपली फसवणूक होत आहे, हे वाचकालाही समजत आहे.''

वाचन म्हणजे लेखक व वाचक यांनी केलेला एक प्रवास असतो, असे सांगून त्या म्हणाल्या, ''ज्या साहित्यातून वाचकाला स्वत:ची, विचारांची, मूल्यांची ओळख पटते ते त्याला आवडते. या मूल्यात्मक जीवनाचे आपल्या सगळ्यांच्याच आयुष्यात एक मोल असते. ते साहित्यातून बघायला आपल्याला आवडत असते, म्हणूनच असे मूल्यात्मक साहित्य आपल्याला आनंद देत राहते.''

मासिकाच्या संपादिका विद्या बाळ यांनी स्वागत केले. सुजाता देशमुख यांनी सूत्रसंचालन केले. आशा साठे यांनी आभार मानले. आशा साठे लिखित व दीपा श्रीराम दिग्दर्शित 'स्वयम्' हा दीर्घांक या वेळी सादर करण्यात आला.

### ❐ 'बाजारातील खपावर सध्या साहित्यिक दर्जाचे मापन'

''बाजारात जे खपू शकेल, ते असाधारण, अशी साहित्याबाबतही परिस्थिती आहे. सध्या साधारण काय व असधारण काय हे शब्द, भाषा किंवा साहित्य ठरवत नाही, तर बाजारातील



परिस्थिती ठरवते,'' असे ज्येष्ठ नाटककार आणि विचारवंत डॉ. गो. पु. देशपांडे यांनी सांगितले.

पुणे विद्यापीठाचे ललित कला केंद्र व महाराष्ट्र कल्चरल सेंटरतर्फे आयोजित व्याख्यानमालेचा समारोप 'सर्जनातील साधारण-असाधारण' या विषयावरील व्याख्यानाने झाला.

डॉ. देशपांडे म्हणाले, ''संस्कृत-प्राकृत, इंग्रजी इतर भारतीय भाषा यांमध्ये असाधारण व साधारण असा संघर्ष फार पूर्वीपासून आहे. संघर्ष फार पूर्वीपासून आहे. साम्राज्यवाद्यांच्या तथाकथित अभिजाततेच्या विचारव्यूहात बसत असाल, तरच तुम्हाला असाधारण मानले जाते. इंग्रजीतून लिहिणारे भारतीय लेखक असाधारण आणि भारतीय भाषांत लिहिणारे साधारण, असा मोह आधुनिकोत्तर समाजालाही पडू लागला आहे. त्यामुळे सर्जन निर्माण करण्याची क्षमता कमी होत आहे. मात्र, लोकभाषा नाकारणारे खऱ्या अर्थाने असाधारण गोष्टी निर्माण करू शकत नाहीत. प्रत्येक भाषेला अभिजात होण्याची आस असते. युरोपातील देशी भाषा यातूनच अभिजात झाल्या. भारतीय लोकभाषांच्या बाबतही हे घडेल.''

### ❐ मंगेश पाडगांवकरांची गाणी आणि बोलगाणी

'इतकं दिलंत तुम्ही मला, खरं सांगतो माणूस केलंत तुम्ही मला' असं म्हणताना रसिकांबद्दलची कृतज्ञता व्यक्त होत असते... 'प्रेमात पडलं की असंच व्हायचं' असं म्हणत प्रेमाचे रंग उलगडत असतात...

अनन्वय फाउंडेशनतर्फे आयोजित 'आनंदयात्री मी' कार्यक्रमात कविवर्य मंगेश पाडगावकर यांच्याकडून कविता ऐकण्याची संधी मिळाली आणि 'गाणी ते बोलगाणी' हा प्रवास त्यांच्या काव्यवाचनाने रंजक झाला. श्री. पाडगावकर यांच्या गीतांचा कार्यक्रम, त्याला त्यांच्याच कवितांचे निवेदन आणि मध्यंतरापूर्वी व कार्यक्रमाच्या शेवटी त्यांचे कवितावाचन असा हा कार्यक्रम होता.

'डोळ्यात जेव्हा आसवं असतात, तेव्हाच माणसं माणसं असतात' असं म्हणत पाडगावकरांनी थेट काळजालाच हात घातला. 'नसलेल्या आजोबांचं असलेलं गाणं' म्हणत आजोबांचं मुकं जगही बोलकं केलं. मोरूच्या कविता वाचताना, त्याचं असहायपणा सांगताना ते समाजातील दांभिकतेवर टीका करून गेले आणि 'सबको सलाम' म्हणत, येथील व्यवस्थेला लागलेल्या किडीबद्दल, शोषणाबद्दल भाष्यही करून गेले. रसिकांनी या कविता त्यांच्या पुस्तकातून वाचल्या होत्या; पण त्यांच्याच तोंडून त्यांचे शब्द ऐकताना त्यातील भावना नेमकी पोचत होती.

कार्यक्रमात रवींद्र साठे, राहुल घोरपडे, राहुल धोंगडे, अनुराधा कुबेर, मीनल फडके यांनी पाडगावकरांची काही प्रसिद्ध गाणी सादर केली. मुग्धा गोडबोले आणि धीरेश जोशी यांनी निवेदन केले. यश परांजपे आणि सन्मय कुलकर्णी यांनी दोन बालकविता सादर केल्या.

### ❐ मनाच्या गरजा भागविण्यासाठी कौतुकाची थाप हवी : डॉ. सरदेसाई

''मनाचे व्यवहार जाणून घ्यायला शिका. मनाच्या मूलभूत गरजा भागण्यासाठी कौतुकाची थाप आवश्यक आहे'', असे प्रतिपादन डॉ. ह. वि. सरदेसाई यांनी केले. त्यांच्या 'आरोग्य : समस्या आणि उपचार' या पुस्तकाचे प्रकाशन 'सकाळ'चे संपादक अनंत दीक्षित यांच्या हस्ते झाले.

डॉ. सरदेसाई म्हणाले, ''विवंचना, चिंता आणि मरगळ अनेकांना येते. याचा अर्थ मन

निसर्गातून बाहेर पडलेले असते. जे जे निसर्गात घडते ते आनंदासाठीच असते. मन प्रसन्न नाही असे वाटले की ते निसर्गात रमवावे. मन प्रसन्न असेल तरच बुद्धी काम करते. जीवापाड कष्ट केल्यानंतर अकारण आघात होऊ नये असे वाटणे स्वाभाविक आहे. गुण ओळखणे हे समृद्ध मनाचे लक्षण असते. बदल ही मनाची गरज असते. निरुद्योगी मन विध्वंसक बनू शकते. यासाठी सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत आपण काय करणार आहोत, याचे वेळापत्रक करून तसा व्यवहार ठेवला पाहिजे.''

श्री. दीक्षित म्हणाले, ''हे पुस्तक सोप्या भाषेत, टवटवीत मनाने लिहिले आहे. डॉ. सरदेसाई जेव्हा लिहितात, तेव्हा तो आरोग्याचा ज्ञानमार्ग असतो. शारीरिक आरोग्यासाठी जीवनपद्धती, आहार आणि शास्त्र यांचे प्रतिपादन प्रवाहीपणे केले आहे. डॉ. सरदेसाई लोकशिक्षणाची मोठी जबाबदारी पार पाडत आहेत.''

डॉ. वा. ल. मंजूळ यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. उत्कर्ष प्रकाशनचे सु. वा. जोशी यांनी आभार मानले.

### ❐ राज्य मराठी बालनाट्य स्पर्धा

द्वितीय महाराष्ट्र राज्य मराठी बालनाट्य महोत्सवासाठी सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे बालनाट्य संस्था तसेच प्राथमिक, माध्यमिक विद्यालये आणि शाळांकडून प्रवेशिका मागवल्या आहेत. या स्पर्धेची प्राथमिक फेरी १ डिसेंबर २००३ पासून राज्यातील ५ केंद्रांवर सुरू होणार असून अंतिम फेरी फेब्रुवारी २००४ मध्ये आयोजित करण्यात येईल असे सांस्कृतिक कार्य संचालकांनी जाहीर केले आहे.

स्पर्धक संस्थांनी आपल्या प्रवेशिका १५ सप्टेंबर २००३ पर्यंत सांस्कृतिक कार्य संचालनालय, जुने सचिवालय विस्तार भवन, पहिला माळा, महात्मा गांधी मार्ग, मुंबई ४०० ०३२ या पत्त्यावर (दूरध्वनी : २२०४ ३५७१, २२०४ ३५५०) पाठवावयाच्या असून प्रवेशिकेसोबत रु. १०० अनामत रक्कम म्हणून डिमांड ड्राफ्टद्वारे पाठविणे आवश्यक आहे. गतवर्षीच्या प्रथम बालनाट्य महोत्सवात ज्या संस्थांनी प्रत्यक्ष प्रयोग सादर केले त्यांनी द्वितीय महोत्सवाच्या प्रवेशिका पोस्टाने पाठविण्यात आल्या आहेत. मात्र ज्यांनी गतवर्षी ऐनवेळी प्रयोग रद्द केले त्या संस्थांना यावर्षीच्या स्पर्धेत भाग घेता येणार नाही. इतर संस्था वा शाळांनी प्रवेशिका व नियमावली मागवून घ्यावी.

स्पर्धेसाठी संस्थांनी सांस्कृतिक कार्य खात्याने निश्चित केलेल्या केंद्रावर आणि दिलेल्या तारखेस प्रयोग केला नाही तर प्रवेशिकेसोबत त्यांनी भरलेली अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

### ❐ श्याम बेनेगल यांच्या 'ब्रिटिश' चरित्राचे प्रकाशन

समांतर चित्रपट चळवळीत आपला अमीट ठसा उमटवलेले भारतीय चित्रपट दिग्दर्शक श्याम बेनेगल यांच्या इंग्रजी चरित्रग्रंथाचे २५ ऑगस्टला ब्रिटिश कौन्सिल प्रेक्षागारात प्रकाशन झाले. जागतिक महत्त्वाचे दिग्दर्शक या ब्रिटिश फिल्म इन्स्टिट्यूटच्या चरित्र मालिकेत समाविष्ट होण्याचा मान लाभलेले बेनेगल हे दुसरे भारतीय दिग्दर्शक आहेत. यापूर्वी हा मान मेनास्ट्रीम सिनमातील यश चोप्रा यांना लाभला होता. या मालिकेत यापूर्वी कॅनडाचे ॲटम



इगोयान, युगोस्लाव्हियाचे इमिर कुस्तुरिका, न्यूझिलंडच्या जेन कँपियन, डेन्मार्कचे लार्स व्हॉन ट्रायर व इजिप्तचे युसुफ छाहिन यांची चरित्रे प्रकाशित झाली आहेत.

आपल्या चित्रपटांतून ठसठशीत स्त्री व्यक्तिरेखा रेखाटणाऱ्या श्याम बेनेगल यांनी १९७४ च्या 'अंकुर' या पहिल्या चित्रपटापासून अगदी अलीकडच्या २००० सालच्या 'झुबेदा' पर्यंतच्या आपल्या चित्रपटांद्वारे जगभरच्या चोखंदळ चित्रपट रसिकांचे लक्ष वेधून घेतले आहे. बेनेगल यांच्या हाताखालून ओम पुरी, शबाना आझमी, नसिरुद्दीन शहा, करिष्मा कपूर, गोविंद निहलानी यांच्यासारखे नामवंत कलाकार कसे तयार होत गेले, याचा आढावा लेखिका संगीता दत्ता यांनी या चरित्रग्रंथात घेतला आहे. श्रीमती दत्ता या लंडनमध्ये 'इन फोकस' ही फिल्म सोसायटी चालवतात.

### ❐ पुल महाकरंडक एकांकिका स्पर्धा

महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी युवक काँग्रेसतर्फे पु. ल. देशपांडे यांच्या स्मरणार्थ राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा घेण्यात येणार असून विजेत्यांसाठी एकूण दोन लाख ३१ हजार रुपयांचा पारितोषिके देण्यात येणार आहेत.

पाच ठिकाणी विभागीय फेरी व प्रथम-द्वितीय विजेत्यांची अंतिम फेरी अशा दोन स्तरांवर ही स्पर्धा होईल.

या स्पर्धेची पहिली फेरी १३ ते १८ सप्टेंबर या काळात होईल. १३ सप्टेंबरला विदर्भ, २० सप्टेंबरला नाशिक व मराठवाडा आणि २७ सप्टेंबरला पुणे व कोकण विभाग अशी विभागीय फेरी होईल. त्यातील प्रथम आणि द्वितीय विजेत्यांची अंतिम फेरी नऊ नोव्हेंबरला अकलूज येथे होईल.

विभागीय पातळीवर करंडक तसेच अनुक्रमे १० हजार, पाच हजार व तीन हजार रुपये अशी पारितोषिके असतील. तसेच अभिनय, दिग्दर्शन, लेखन, नेपथ्य, संगीत, प्रकाशयोजना, वेशभूषा यासाठी प्रत्येकी ७०० रुपयांचे पारितोषिक देण्यात येईल. अंतिम फेरीत प्रथम विजेत्यास ५१ हजार रुपये रोख, 'पु. ल. देशपांडे फिरता महाकरंडक' दिला जाईल.

### ❐ हिलरी क्लिंटन आणि हॅरी पॉटर

हिलरी क्लिंटन आणि हॅरी पॉटरची जन्मदात्री जे. के. रोलिंग यांच्या पुस्तकांसाठी अजूनही अमेरिकेतल्या पुस्तकांच्या दुकानांसमोर लांबच लांब रांगा लागलेल्या असतात. या पुस्तक-दिंडीत अनेकदा काही मजेदार गोंधळ होतात. त्याचे किस्से हिलरी क्लिंटन यांनीच सांगितले. या पुस्तकांसाठी एकाच दुकानात रांगा असल्यामुळे पॉटरमॅनियाने झपाटलेल्या लहानग्यांच्या हातात हिलरी यांचं पुस्तक पडतं, तर हिलरी यांच्या चाहत्यांच्या हातात हॅरी पॉटर येतो! हिलरी आणि जे. के. रोलिंग यांच्यात पुस्तकविक्रीवरून स्पर्धा असली तरी ही स्पर्धा निकोप आहे, हेच हिलरी यांच्या बोलण्यातून स्पष्ट झालं. दुकानाबाहेर हॅरी पॉटर आणि आपल्या पुस्तकासाठी लागलेल्या रांगा आणि वाचकांचा उत्साह बघून अतीव समाधान मिळतं, असंही हिलरींनी नमूद केलं.

### ❐ चतुरंग संध्येत 'प्रभात' चे स्मरण

'प्रभात फिल्म कंपनी'ने नुकतेच अमृतमहोत्सवी वर्षात पदार्पण केले आहे. त्यानिमित्ताने

ऑगस्ट महिन्याच्या 'चतुरंग निमित्तसंध्ये'त अरुणा दामले यांच्या 'प्रभात गीते' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

अयोध्येचा राजा, कुंकू, माणूस, शेजारी, रामशास्त्री अशा एकाहून एक सरस चित्रपटांद्वारे या चित्रपट कंपनीने रसिकमनांवर दीर्घकाळ अधिराज्य गाजवले. त्यांच्या चित्रपटातील आता कशाला उद्याची बात, दोन घडीचा डाव, लखलख चंदेरी तेजाची आदी लोकप्रिय गाण्यांच्या सादरीकरणासह मोठ्या पडद्यावर कुंकू, शेजारी, माणूस यातील निवडक चित्रपटदृश्यांचाही या कार्यक्रमात समावेश होता.

### ❒ दया पवार यांच्या गावचे वाचनालय

धामणगाव आवारी (ता. अकोले) येथे दिवंगत साहित्यिक दया पवार यांच्या नावाने वाचनालय सुरू झाले आहे. या वाचनालयामुळे गावाची वाचन संस्कृती वाढीला लागली आहे.

धामणगाव आवारी हे दया पवार यांचे जन्मगाव. काळाच्या ओघात गावाचा कायापालट होतो आहे. 'टँकर व्हिलेज' म्हणून असणारी गावाची ओळख ग्रामस्थांच्या पुढाकारामुळे आता बदलू पाहत आहे. अनेक आघाड्यांवर होणारा बदल हा निश्चितच सुखावह आहे.

दया पवार यांनी आपल्या साहित्याद्वारे आपला लौकिक व गावाची ओळख सातासमुद्रापार नेली. त्यांचे निधन ग्रामस्थांना विषण्ण करून गेले. त्याचा परिणाम म्हणून गावातील 'अमृतेश्वर विकास मंडळा'ने सन २००० मध्ये 'पद्मश्री दया पवार' वाचनालय सुरू केले.

अवघ्या पाच पुस्तकांनी हे वाचनालय सुरू झाले. आता या वाचनालयात तीनशेहून अधिक पुस्तके आहेत. वाचनामुळे शेती तंत्रज्ञानात बदल झाला आहे. पारंपरिक शेती तंत्रज्ञान जाऊन आता आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर येथील शेतकरी करीत आहेत. उत्पन्नवाढीसाठी शेतीविषयक मासिकांचा वापर तरुण शेतकरी करीत आहेत. टोमॅटो, कांदा, भुसार मालांसाठी टाकावयाच्या खताच्या मात्रा व औषधांची फवारणी यातही आधुनिक दृष्टी येथील शेतकऱ्यांची बनली आहे, असे वाचनालयाचे सदस्य भाऊसाहेब आवारी, अशोक देशमुख यांनी सांगितले.

वाचनामुळे तरुणांना पर्यावरणाची जाणीव झाली आहे. दगडी बंधारे, बांधबंदिस्ती आणि जलसंधारण मोहिमेचे या गावाला त्यामुळे महत्त्व कळले आहे. 'वृक्ष लागवड' व 'संवर्धन' या मोहिमेला या गावाने प्राधान्य दिले आहे. त्याची फलश्रुती गावाच्या भूगर्भातील पाणी पातळी वाढण्यात आणि शेत बागायत क्षेत्र वाढण्यात झाली आहे, असे काशिनाथ आवारी व सखाहरी आवारी (गुरुजी) यांनी सांगितले.

वाचनाचे वेड गावकऱ्यांचे ऐक्य वाढविण्यास कारणीभूत ठरले आहे. स्थानिक स्तरावरील झगड्यांचे प्रमाण कमी झाले आहे. सांस्कृतिक, धार्मिक व आर्थिक आघाड्यांवर या वाचनालयाचा अप्रत्यक्षरीत्या परिणाम झाला आहे, असे गावकरी म्हणतात.

### ❒ 'नृत्यकलेच्या विकासासाठी नव्या कलाकारांनी पुढे यावे'

''महाराष्ट्रात नाट्य, गायन या कलांची थोर परंपरा आहे. त्या तुलनेत, नृत्यकला मात्र फारशी समृद्ध झालेली नाही. ही उणीव भरून काढण्यासाठी नव्या कलाकारांनी व संस्थांनी पुढे आले पाहिजे.'' असे प्रसिद्ध दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांनी पुणे येथे सांगितले.



'सुरभी कल्चरल ॲकॅडमी' तर्फे ज्येष्ठ कथक नृत्य कलाकार मनीषा साठे व अभिनेत्री मृणाल कुलकर्णी यांना डॉ. पटेल यांच्या हस्ते 'सुरभी नैपुण्य पुरस्कार' देण्यात आला.

श्रीमती साठे, श्रीमती कुलकर्णी, डॉ. वीणा देव यांनीही मनोगत व्यक्त केले. मधुरा लेले यानी मानपत्राचे वाचन केले. ॲकॅडमीच्या अध्यक्षा हेमा लेले यांनी प्रास्ताविक केले.

### ❒ नीना गुप्ता यांचे पुस्तक

गेल्या दोन वर्षात बिगबजेट हिंदी चित्रपटांवर निर्मितीवर आधारलेल्या चित्रपटांची पुस्तके प्रकाशित करण्याची एक फॅशन चित्रपटसृष्टीत आली आहे. 'अशोका', 'लगान', 'कभी खुशी कभी गम' या चित्रपटांवर आधारलेली पुस्तके यापूर्वीच बाजारात आली आहेत. आता मालिकांवर पुस्तके प्रकाशित करण्याची प्रथा सुरू झाली आहे. पेंग्विन या प्रख्यात प्रकाशन संस्थेने अभिनेत्री नीना गुप्ताला 'साँस' आणि 'सोनपरी' या मालिकांवर पुस्तक लिहिण्याची 'ऑफर' दिली आहे. चित्रीकरण सुरू असताना वेळात वेळ काढून नीना सध्या मालिकेच्या सेटवरच या लेखन करीत असते.

### ❒ ना. सी. फडके यांच्या व्यक्तिमत्त्वातील पैलूंचा शोध घ्यावा : मोरे

''ना. सी. फडके यांच्या व्यक्तिमत्वाचे अनेक पैलू दुर्लक्षित आहेत. या पैलूंचा शोध त्यांच्या साहित्यातून घेतला जावा,'' असे प्रसिद्ध लेखक सदानंद मोरे यांनी सुचविले.

ना. सी. फडके गौरव समितीतर्फे देण्यात येणाऱ्या विविध पुरस्कारांचे वितरण त्यांच्या हस्ते झाले.

कादंबरीसाठीचा पुरस्कार 'पार्टटाईम'च्या लेखिका प्रतिमा इंगोले यांना, तर ललित गद्यासाठीचा पुरस्कार कृष्णमेघ कुंटे यांच्या 'एका रानवेड्याची शोधयात्रा' या पुस्तकाला देण्यात आला. कमला फडके पुरस्कार आशा भाजेकर यांना कथासाहित्यातील योगदानाबद्दल देण्यात आला.

डॉ. मोरे म्हणाले, ''फडके यांचे व्यक्तिमत्त्व बहुआयामी होते. नास्तिक झाल्यावरही त्यांना संतसाहित्य वाचणे व ऐकणे आवडायचे. त्याचा ठसा त्यांच्यावर होता. टिळकांच्या काही शिष्यांनी दारूबंदीचे कार्य केले. त्यातही फडके अग्रेसर होते. कला, क्रीडा अशा विविध क्षेत्रांत ते वावरले. त्याविषयी लिहून ठेवले. त्यामुळे इतिहासाच्या अभ्यासकांची मोठी सोय झाली आहे.'' विजय फडके यांनी आभार मानले.

### ❒ मध्यमवर्गीयांची उदासीनता समाजासाठी घातक

मध्यमवर्गीयांची उदासीनता आजच्याइतकी यापूर्वी कधीच नव्हती. आर्थिक विषमता म्हणजे काय हे जाणून घेणारा व त्यावर उपाय शोधणारा हाच महत्त्वाचा घटक आहे. मात्र सध्या तोच उदासीन झाला आहे. समाजाच्या दृष्टीने ही गोष्ट घातक ठरण्याचा संभव आहे, असे मत 'उपरा'कार आमदार लक्ष्मण माने यांनी व्यक्त केले.

आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठान व महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा, सासवड यांच्या संयुक्त विद्यमाने सहावे आचार्य अत्रे मराठी साहित्य संमेलन साजरे झाले. या प्रसंगी संमेलनाध्यक्ष प्रा. माधव वझे, उद्घाटक उल्हास पवार, स्वागताध्यक्ष प्रा. प्रदीप जगताप, रावसाहेब पवार, विजय कोलते, शांताराम पोमण, जयसाहेब पुरंदरे, नंदा सुर्वे, संजय दिनकर कुलकर्णी,

अभिनेते राहुल सोलापूरकर आदी उपस्थित होते.

श्री. माने यांना यंदाचा अत्रे साहित्य पुरस्कार, तर राहुल सोलापूरकर यांना कलाकार पुरस्कार आणि संजय दिनकर कुलकर्णी यांना पत्रकारिता पुरस्कार देण्यात आला.

राहुल सोलापूरकर, संजय कुलकर्णी, रावसाहेब पवार यांचीही भाषणे झाली. संमेलनाध्यक्ष प्रा. माधव वझे यांनी औपचारिक भाषण बाजूला ठेवून श्यामची आई चित्रपटातील आपल्या श्यामच्या आठवणी सांगून आचार्य अत्रे यांचे कर्तृत्व यावर वेगळा प्रकाश टाकला.

### ❒ एकांकिका लेखन, दिग्दर्शन कार्यशाळेचा समारोप

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान व विशाल सह्याद्री ट्रस्ट यांच्यातर्फे एकांकिका लेखन व दिग्दर्शन कार्यशाळा घेण्यात आली. तिच्यात डॉ. वि. भा. देशपांडे, शेखर ढवळीकर, गिरीश जोशी, श्रीनिवास भणगे, सुहास कुलकर्णी व अतुल पेठे यांनी मार्गदर्शन केले. माजी महापौर अंकुश काकडे यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन झाले. माजी आमदार ज्ञानेश्वर खैरे यांच्या अध्यक्षतेखाली समारोप झाला.

### ❒ ठाकरे यांच्या हस्ते 'गणपती गुणपती' चे प्रकाशन

मराठीतील गणपतीच्या अकरा आरत्यांचा संग्रह असलेल्या 'गणपती गुणपती' या कॅसेटचे शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या हस्ते 'मातोश्री' बंगल्यात प्रकाशन झाले.

मराठीत अनेक संतांनी गणपतीच्या आरत्या रचल्या. त्यापैकी फक्त काहीच सर्वतोमुखी झाल्या. यंदाच्या गणेशोत्सवात या आरत्यांचा सर्वदूर प्रसार होऊन भाविकांना एकत्रितपणे आरत्या म्हणता याव्यात, या उद्देशाने हा संग्रह तयार करण्यात आल्याचे 'ओम सोऽम् म्युझिक' चे निर्मिती सूत्रधार आदेश बांदेकर यांनी सांगितले.

'गणपती गुणपती' या कॅसेटमध्ये संत रामदास, नामदेव, माणिकदास, सरस्वतीसुत, मुक्तेश्वर, मोरश्वरसुत, गोसावी नंदन प्रभृती संतांनी रचलेल्या अकरा आरत्यांचा समावेश आहे. गणपतीच्या मराठीतील इतक्या आरत्या सुश्राव्य संगीतासह एका संग्रहात येण्याची ही पहिलीच वेळ. 'ऐका आणि म्हणा' हे या कॅसेटचे सूत्र असून त्यामुळे या आरत्या घरी व सार्वजनिक ठिकाणी समूहाने म्हणता येतील.

कॅसेटची संकल्पना व संयोजन नीना राऊत यांचे असून कमलेश भडकमकर संगीत दिग्दर्शना केले आहे. खाली ऋषिकेश कामेरकर, अजित परब, मंदार आपटे, राधारमण कीर्तने, अंजली तळेकर व सोनाली कर्णिक यांनी त्या गायल्या आहेत.

### ❒ 'विज्ञान आणि तंत्रज्ञानाची सांगड आवश्यक'

''फक्त अभियांत्रिकीचे किंवा विज्ञानाचे शिक्षण येथून पुढील काळात उपयोगी पडणार नसून, विज्ञान आणि तंत्रज्ञान यांची सांगड घालणे गरजेचे आहे,'' असे ज्येष्ठ शास्त्रज्ञ प्रा. डॉ. गोविंद स्वरूप यांनी सांगितले.

निनाद संस्थेतर्फे दिला जाणारा 'निनाद' पुरस्कार ज्येष्ठ कृषितज्ज्ञ डॉ. बुधाजीराव मुळीक यांना डॉ. गोविंद स्वरूप यांच्या हस्ते देण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. डॉ. विकास खैरे, यशवंत खैरे आणि डॉ. रामचंद्र साबळे यांनाही उल्लेखनीय कार्याबद्दल डॉ. स्वरूप यांच्या हस्ते गौरवण्यात



आले. प्रतिभा शाहू मोडक, नगरसेविका शुभदा जोशी आदी या वेळी उपस्थित होते.

डॉ. स्वरूप म्हणाले, ''विज्ञान आणि तंत्रज्ञानाला सध्या आपण वेगवेगळ्या कप्प्यात घातले आहे. त्यांची सांगड घालणारे शिक्षण देण्याची सध्या गरज आहे. त्यासाठी नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स ही संस्था सुरू करण्याबाबत प्रक्रिया सुरू असून, त्यामध्ये 'टेक्नॉलॉजी' हा शब्दही जोडण्याची सूचना मी करणार आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाची योग्य सांगड घातल्यामुळेच चीनची प्रगती झाली. आपल्यालाही याच मार्गावरून जावे लागेल.''

''येथून पुढे नोकऱ्या मिळणे कठीण होणार आहे. त्यामुळे शेतीकडे विशेष लक्ष पुरवण्याची गरज आहे. मात्र, सध्या तरी त्याकडे दुर्लक्षच होत आहे,'' अशी खंत डॉ. मुळीक यांनी व्यक्त केली.

संस्थेचे कार्याध्यक्ष वल्लभ जोशी यांनी पुरस्कारविजेत्यांचा परिचय करून दिला. संस्थापक-कार्याध्यक्ष उदय जोशी यांनी सूत्रसंचालन केले.

### ❒ 'समाजजीवनानुसार राज्यशास्त्राचा अभ्यास व्हावा'

''बदलत्या परिस्थितीत समाजशास्त्राच्या सीमारेषा धूसर होत आहेत. अर्थशास्त्र, समाजशास्त्र या विषयांचा जसा भारतीय समाजजीवनातील संकल्पनेनुसार अभ्यास होतो, त्या प्रमाणे भारतीय राज्यशास्त्राचाही अभ्यास व्हायला हवा,'' असे मत राज्यशास्त्राचे अभ्यासक डॉ. यशवंत सुमंत यांनी पुणे येथे व्यक्त केले.

आबासाहेब गरवारे महाविद्यालयातील राज्यशास्त्र अभ्यास मंडळाच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. सुमंत बोलत होते. प्राचार्य डॉ. अरविंद इनामदार अध्यक्षस्थानी होते. राज्यशास्त्राच्या बदलत्या स्वरूपाबद्दल डॉ. सुमंत म्हणाले, ''दुसऱ्या महायुद्धानंतर सामाजिक शास्त्रांमध्ये मोठ्या प्रमाणात बदल होत आहेत. सार्वजनिक जीवनातील सत्तेचा अभ्यास म्हणजे राज्यशास्त्र नाही, तर व्यक्तिगत आयुष्यातील सत्तासंबंध हेही आता राज्यशास्त्राच्या व्यापक अभ्यास संकल्पनेत समाविष्ट होत आहेत. या बदलांचा मागोवा घेऊन राज्यशास्त्र या विषयात संशोधन व्हायला हवे.''

''समाजशास्त्रज्ञांनी सर्वसामान्य जनतेशी कायम संवाद राखला पाहिजे. कारण राज्यशास्त्र हे मूल्यांचा आग्रह धरणारे शास्त्र आहे. या विषयाचे व्यापक भान येण्यासाठी विद्यार्थ्यांनी मूल्ये, वास्तव, धोरणांचा विचार करून राज्यशास्त्राचे योगदान समजून घ्यायला हवे. या विषयांचा अभ्यास करताना इतर विषयांच्या संकल्पनांचीही माहिती करून घ्यायला हवी,'' अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

''सध्याच्या राजकीय नेत्यांकडून भेकडवाद पोसला जात आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी युवकांनीच पुढाकार घ्यायला हवा. कारण, या प्रश्नांचे उत्तर राज्यशास्त्रातील कोणत्या सिद्धांतातून सापडेल, असे वाटत नाही,'' असे मत प्राचार्य इनामदार यांनी व्यक्त केले. डॉ. शरद घोडके यांनी प्रास्ताविक केले. प्रा. अपर्णा आगाशे यांनी आभार मानले.

### ❒ प्राध्यापकांच्या पीएच. डी. ची चौकशी

राज्यातील कृषी वगळता सर्व विद्यापीठात व या विद्यापीठांशी संलग्न महाविद्यालयात वर्ष १९९५ नंतर नेमणुका झालेल्या प्राध्यापकांच्या पीएच. डी. बाबतची चौकशी करावी व बनावट पीएच. डी. घेतलेल्या प्राध्यापकांविरुद्ध कारवाई करावी, असे आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या

औरंगाबाद खंडपीठाने दिले आहेत. उच्च शिक्षण संचालकांनी याबाबतचा अहवाल सहा महिन्यांत खंडपीठात सादर करावा, असे न्यायमूर्ती बी. एच. मर्लापल्ले व न्या. पी. व्ही. काकडे यांनी स्पष्ट केले.

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाअंतर्गत कार्यरत असलेल्या काही प्राध्यापकांनी बनावट पीएच. डी. मिळविल्या आहेत, असे वृत्त पाच महिन्यांपूर्वी प्रसिद्ध झाले होते. औरंगाबाद खंडपीठाने त्याची स्वत:हून दखल घेऊन जनहित याचिका दाखल करून घेतली. या संदर्भात उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला नोटीस पाठवून उत्तर सादर करण्यास सांगितले. विद्यापीठाने पीएच. डी. मिळविलेल्या प्राध्यापकांना नोटिसा पाठविल्या. दरम्यान शेंदुर्णी येथील महाविद्यालयातील प्रा. जॉर्ज अलेक्झांडर यांनी पत्र पाठवून प्रा. पी. डी. पाटील यांनी मगध विद्यापीठातून (बिहार) बनावट पीएच. डी. घेतली असावी, अशी शंका व्यक्त केली. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने मगध, रांची (बिहार) व विनोबा भावे (झारखंड) आदी विद्यापीठांकडून माहिती मागविली. संबंधितांना पीएच. डी. दिली नसल्याचे या विद्यापीठांनी कळविले. प्रा. बी. डी. पाटील, प्रा. ललवाणी, प्रा. अग्निहोत्री, प्रा. सैनानी, प्रा. वायकोस, प्रा. जगदेव या सहा प्राध्यापकांनी बनावट पीएच. डी. मिळविल्याचे प्रकरण उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेसमोर ठेवण्यात आले. बनावट पीएच. डी. धारक शोधण्यासाठी समिती नेण्यात आली. या प्राध्यापकांना नोटिसा देण्यात आल्या. त्यापैकी प्रा. सैनानी हे अंमळनेरच्या प्रताप महाविद्यालयात प्रभारी प्राचार्य म्हणून कार्यरत होते.

विद्यापीठ अनुदान मंडळाने चार एप्रिल २००० रोजी अधिसूचना काढली. १९९५ नंतर नेमणूक झालेल्या प्राध्यापकांना २००३ पर्यंत 'नेट-सेट' उत्तीर्ण होणे त्यानुसार सक्तीचे करण्यात आले. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या कुलगुरूंनी सहा प्राध्यापकांची मान्यता काढून घेतली. संबंधित महाविद्यालयांच्या व्यवस्थापनाने त्यांची सेवा समाप्त करून पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल केले.

### ❒ नाट्यशास्त्रातील संहितेचे विश्लेषण होण्याची गरज

आधुनिक युगातील अनुभव लक्षात घेऊन नाट्यशास्त्रातील संहितेचे विश्लेषण होण्याची गरज आहे, असे प्रसिद्ध नाटककार डॉ. गो. पु. देशपांडे यांनी सांगितले.

पुणे विद्यापीठाचे ललित कला केंद्र आणि महाराष्ट्र कल्चरल सेंटर यांच्या वतीने आयोजित व्याख्यानमालेत डॉ. देशपांडे 'नाट्यशास्त्र' या विषयावर बोलत होते.

डॉ. देशपांडे यांनी पाश्चिमात्य नाटककारांचे अनेक दाखले देऊन नाट्यशास्त्रातील रससिद्धान्तावर विवेचन केले. ते म्हणाले, ''रससिद्धान्त रास्त आहे की नाही, हे ठरविण्यापूर्वी मध्ययुगात घडलेल्या घटनांचा आणि अभ्यासाचा विचार करावा लागेल. या युगातले अनुभव लक्षात घेऊन, आपल्याला नाट्यशास्त्रातील संहितेचे नवे संदर्भ जुळवावे लागतील. रससिद्धान्त हा चैतन्यमयी आणि सामाजिक अशा दोन मार्गांनी वाटचाल करीत असतो. या दोन्ही मार्गांचा स्वतंत्रपणे अभ्यास करून आपल्याला तर्कसंगत अर्थ लावावा लागेल.''

रससिद्धान्त परंपरेविषयी महाराष्ट्रात फारशी जागरूकता झाली नसल्याचे सांगून, नाटक आणि रसभावना यांचे नाते काय आहे, हे त्यांनी अभिनवगुप्त आणि भट्टनायक यांचे दाखले देऊन स्पष्ट केले.



''संघर्षातून नाटक निर्माण झाले असून, ते संघर्षालाच प्रवृत्त करणारे असते, या मुद्द्याकडे बहुतेकांचे दुर्लक्ष झाले आहे,'' याची जाणीव त्यांनी करून दिली. ते म्हणाले, ''नाटक निर्माण झाले तेच मुळी हिंसेतून; सूर-असुरांच्या संघर्षातून. नाटक खुल्या जागेतून बंदिस्त जागेत आले, तेही नाटकामुळे होणाऱ्या हिंसेला प्रतिबंध घालावा म्हणूनच. नाटकाने केवळ आनंदच दिला, तर ते फार काळ स्मरणात राहत नाही; मात्र जर ते अस्वस्थ करणारे, विचारांना प्रवृत्त करणारे व त्रासदायक असेल, तर ते लक्षात राहते.''

''नाटक हे वास्तव नसते, असा एक सिद्धांत आहे. म्हणजे ते चित्रित वास्तवासारखे आभासी असते. वस्तुरूप वास्तव व कलात्मक वास्तव यातील फरक भारतीय नाट्यशास्त्राने केला आहे. पात्र हे आस्वाद घ्यायला मदत करणारे असते, असे सांगणारे भारतीय नाट्यशास्त्र हे स्वयंभू आहे. आमच्या भाषा या मध्ययुगीन आहेत. त्यामुळे त्या वेळचा कलाविषयक अनुभव लक्षात न घेता तत्कालीन संहितांवर भाष्य करणे अयोग्य ठरेल,''

ललित कला केंद्राचे विभागप्रमुख सतीश आळेकर यांनी स्वागत केले.

### ❒ वृत्तपत्रांनी मध्यमवर्गावर लक्ष केंद्रित करावे

''वृत्तपत्रांनी दिलेल्या सकारात्मक बातम्यांचा वाचकांवर आणि समाजावर चांगला परिणाम होत असतो. त्यामुळे समाजात सुधारणा घडवून आणण्यासाठी वृत्तपत्रांनी मध्यमवर्गावर लक्ष केंद्रीत करायला हवे,'' असे प्रतिपादन पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अशोक कोळस्कर यांनी येथे केले.

पुणे श्रमिक पत्रकार संघ आणि पुणे विद्यापीठ यांच्या वतीने चालविण्यात येणाऱ्या वृत्तपत्रविद्या पदविका अभ्यासक्रमाच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त ते बोलत होते. 'सकाळ'च्या कोल्हापूर आवृत्तीचे कार्यकारी संपादक मल्हार अरणकल्ले प्रमुख पाहुणे होते.

डॉ. कोळस्कर म्हणाले, ''वृत्तपत्रे नीतिमूल्ये पटवून देण्याचे काम करतात. काही वाचकांचा भडक बातम्या वाचण्याकडे कल असला, तरी अशा बातम्या देणारी वृत्तपत्रे फार काळ टिकाव धरू शकत नाहीत.''

श्री. अरणकल्ले म्हणाले, ''सध्या इलेक्ट्रानिक माध्यमांचे आकर्षण वाढत आहे; परंतु मुद्रित माध्यमांची वाटचाल आणि वय लक्षात घेतले, तर त्यांचाच पगडा अधिक आहे. आज पत्रकारांचा स्वत:च्या भूमिकेविषयीच गोंधळ आहे असे दिसते. त्यामुळे काही वेळा भान आणि तारतम्य सुटते. समाजात अनेक दु:खे, अपेक्षा पत्रकारांची वाट पाहत आहेत. रोजच्या धकाधकीत त्यांच्याकडे लक्ष द्यायला त्यांना वेळ मिळणार की नाही, हा चिंतेचा विषय आहे.''

वृत्तपत्र विद्या विभागाचे प्रमुख डॉ. किरण ठाकूर यांनी प्रास्ताविक केले. पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रकाश भोईटे यांनी आगामी उपक्रमांची माहिती दिली.

### ❒ कुसुमाग्रजांच्या कवितांच्या हिंदी अनुवादाची ध्वनिफित

''कुसुमाग्रजांच्या कविता मराठी असल्या तरी त्यात संपूर्ण देशाचा स्वर आहे. अशा कविता हिंदी वाचकांपर्यंत पोहचविण्याचे कार्य लीना मेहेंदळे यांनी केले आहे,'' असे लोकसभेचे सभापती मनोहर जोशी यांनी 'आनन्द लोक' या ध्वनिफितीच्या प्रकाशन समारंभात सांगितले. अध्यक्षपदी पेट्रोलियम मंत्री राम नाईक होते.

‘आनन्द लोक’ मध्ये श्रीमती मेहेंदळे यांनी अनुवाद केलेल्या १०८ कवितांचा समावेश असून, शंकर वाजपेयी यांनी त्या स्वरबद्ध केल्या आहेत.

### ❒ राजवाडे संशोधन मंडळाला प्राचीन वराहमूर्ती मिळणार

बेटावद (ता. शिंदखेडा) येथील प्राचीन वराहमूर्ती इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळाकडे हस्तांतर करण्यात आले. पुरातत्त्वशास्त्राच्या अभ्यासकांच्या दृष्टीने ही मूर्ती अतिशय महत्त्वाची असून, तिचे जतन आणि संशोधन होणे गरजेचे आहे. त्यामुळे मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी अनेक दिवसांपासून ही मूर्ती मिळावी यासाठी ग्रामस्थांकडे आग्रह धरला होता.

### ❒ ज्ञानदेव आणि आपण

पुण्यात ‘पाथफाइंडर’च्या वतीने ‘ज्ञानदेव आणि आपण’ या विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. पुणे विद्यापीठातील ज्ञानदेव अध्यासनचे प्रमुख दिलीप चित्रे यांच्यासह तुकाराम अध्यासनचे प्रमुख डॉ. सदानंद मोरे, शैलीविज्ञानाचे अभ्यासक प्राचार्य दिलीप धोंगडे आणि ज्येष्ठ समीक्षक रा. ग. जाधव यांनी या परिसंवादात भाग घेतला.

ज्ञानदेवांनी सर्वप्रथम मराठीला वाङ्मयभाषा म्हणून स्थान मिळवून दिले, असे सांगून चित्रे म्हणाले की, त्याद्वारे मराठी वाङ्मयाच्या ज्ञानसाधनेचा पायाही त्यांनी रचला. स्त्रियांनी मौखिक परंपरेतून घेतलेली जात्यावरची आवी ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीसाठी निवडली. लौकिक-अलौकिकांत अद्वैत आहे, असे सांगणाऱ्या ज्ञानदेवांनी धर्मनिरपेक्षता कृतीत उतरविली. अनेक वंश, धर्म, जाती, पंथ यातून जो बहूपारंपरिक भारत तयार झाला, त्याचे प्रतिनिधीत्व ज्ञानदेव करतात. संस्कृतीकडे बघण्याची व्यापक दृष्टी त्यांनी दिली. त्यांच्या कालखंडात अनेक दिग्गज कवी मराठीत एकत्र नांदताना दिसतात. चोखोबा, गोरोबा, नामदेव, सावता माळी हे वेगवेगळ्या बलुत्यांचे प्रतिनिधीत्व करीत होते. त्या-त्या बलुत्यांची भाषा ज्ञानदेवांनी वापरली. एकसंध सर्वसमावेशक मराठी समाज कसा असू शकतो, याचे तेराव्या शतकात त्यांनी दर्शन घडवले. ऐतिहासिकदृष्ट्या मराठीतील सामाजिक, सांस्कृतिक परंपरा व त्यात वारकऱ्यांनी घातलेली भर आणि आजचे जीवन, यांचा अभ्यास व्हायला हवा. वारकरी हा पंथ नसून धर्म आहे.

डॉ. सदानंद मोरे यांनी ज्ञानेश्वरीमधील पहिल्या अध्यायातील सुरुवातीच्या ओवींवर विवेचन केले. ते म्हणाले की, ज्ञानदेवांचा उद्देश वैदिक गणेशपुराणात वर्णिलेल्या गणेशाला वंदन करणे, हा नसून त्यांनी गणेशाच्या रूपकातून शब्दब्रह्माला वंदन केलेले आहे. ज्ञानदेवांची शब्दब्रह्माची कल्पना वैदिक दर्शनाचा समावेश करू शकणारी संकुचित कल्पना नसून, भारतीय परंपरेत वाढलेल्या तत्त्वज्ञान आणि तत्त्वज्ञानबाह्य अनेक गोष्टींना कवेत घेणारी आहे. गणेशरूपी शब्दब्रह्माच्या गंडस्थळाचे द्वैत आणि अद्वैत हे दोन्हीही भाग असल्याचे सांगणारे ज्ञानदेव हे वैदिक-अवैदिक, द्वैत-अद्वैत अशा संकुचित विचारांच्या पलीकडे जातात.

ज्ञानदेवांच्या अगदी लगतच्या पूर्वसुरी संगीतरत्नाकर लिहिणारा शार्ङ्गदेव हा यादवराजा सिंघण याच्या दरबारात होता. त्याच्या लेखनात अभिनवगुप्तांचे व इतर काश्मिरी आचार्यांचे संदर्भ येतात. काश्मीर ही जशी शैवांची विकासभूमी होती, तशीच बौद्धांची व वैष्णवांचीही होती. या तीनही दर्शनांनी परस्परांवर प्रभाव पाडलेला असून, परस्परांचे विचार घेतलेले आहेत.



ज्ञानदेवांचा बौद्धदर्शनाबाबतचा दृष्टिकोन उदार आणि व्यापक आहे. कारण मुळात शैवांचा दृष्टिकोन तसा आहे. म्हणूनच खंडित स्वरूपात का होईना, ज्ञानदेवांनी बौद्ध दर्शनाला शब्दब्रह्माचा एक भाग मानले. त्यांनी सर्व प्रवाह पचवले आहेत. वैदिक-अवैदिक, द्वैत-अद्वैत, तात्त्विक-अतात्त्विक अशा संकुचित द्वंद्वरेषा त्यांनी केव्हाच ओलांडल्या आहेत.

पुढे ते म्हणाले, ‘ग्रामसंस्कृतीत लोकांचं अनौपचारिक शिक्षण वारकरी संप्रदायाने केले आहे. साक्षरतेची ही आद्य चळवळ होती. समाजातल्या विविध स्तरांतले कवी पुढे आल्यामुळे एक आश्वासक वातावरण तयार झाले होते. ‘नाचू कीर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावू जगी ।’ म्हणणारे संत नामदेवराय हे या चळवळीचे आद्यप्रवर्तक. सुतारबाबा, सोनारबाबा वगैरे कीतर्नकारांनी पायपीट करून समाज जागृत ठेवला. कीर्तन व्हायचं म्हणजे अवघ्या गावाची शाळा व्हायची. संतांची रसाळ, प्रगल्भ भाषा आपल्या भूविशिष्ठ बोलीभाषेतून निरूपणाच्या आधारे लोकांपर्यंत पोहोचवायचे. परिणामत: लोकांचा परिभाषासापेक्ष व्यवहार सहजपणे व्हायचा. आज तसा होत नाही, हे सत्य आपण स्वीकारायला हवे. विविध व्यावसायिकांची रुपके वापरून वारकरी कवींनी रचना केली. त्यामुळे भाषेची सामाजिक अंगाने अभिवृद्धी झाली, हे ध्यानात घ्यायला हवे.

ज्ञानदेवांनी जीवनात महासमन्वयाचीच भूमिका बजावली. ज्ञानेश्वरी म्हणजे भारतीय परंपरेचे विस्तारीकरण आहे. ज्ञानदेव भाष्यकारांना विचारात घेत भाषा घडविणारे लेखक होते. ते वाङ्मयीन दृष्टी असणारे लेखक आहेत. प्रेरक म्हणूनच त्यांच्याकडे पाहिले जाईल. ज्ञानदेव आपला वारसा आहे, असे म्हटल्याने तो सिद्ध होत नाही. तो अर्जित करावा लागतो, मिळवावा लागतो, असे मत ज्येष्ठ समीक्षक प्रा. रा. ग. जाधव यांनी व्यक्त केले.


### ❒ नाटकांनी चित्रपटांचे अनुकरण करू नये

‘‘नाटक ही एक जिवंत कला असून, चित्रपट हे एक तंत्र आहे. त्यामुळे नाटकांनी चित्रपटांचे अनुकरण करण्याचा प्रयत्न करू नये,’’ असे मत ज्येष्ठ अभिनेते चित्तरंजन कोल्हटकर यांनी व्यक्त केले.

‘बालरंगभूमी’ संस्थेच्या वर्धापनदिनानिमित्त ज्येष्ठ बालनाट्य लेखक व दिग्दर्शक कृष्णदेव मुळगुंद यांना श्री. कोल्हटकर यांच्या हस्ते ‘कृतज्ञता पुरस्कार’ देण्यात आला. संस्थेतर्फे महेंद्र दुधाने यांना ‘उदयोन्मुख दिग्दर्शक’ पुरस्कार देण्यात आला.

श्री. कोल्हटकर म्हणाले, ‘‘आमच्या काळातील बहुतांशी बालनाट्ये पौराणिक कथांवर आधारित होती. अलीकडच्या नाटकांवर मात्र चित्रपटांचा प्रभाव जाणवतो. यामुळे संस्कारक्षम नाटकांच्या निर्मितीचे प्रमाण कमी होत आहे. यासाठी बालनाट्यांची निर्मिती करताना मुलांना प्रगतीच्या दिशेने नेणाऱ्या दर्जेदार विषयाची निवड करावी.’’

श्री. मुळगुंद यांच्या लिखित मनोगताचे वाचन दीप्ती मानेगावकर यांनी केले. मुळगुंद यांनी सद्य:स्थितीतील बालनाट्यांच्या दर्जाविषयी खंत व्यक्त केली व या परिस्थितीत सुधारणा होण्यासाठी नवोदितांना मार्गदर्शन करण्याची तयारीही दर्शविली. बालरंगभूमीचे संचालक प्रसाद कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. यानंतर ‘खोडकर चिंटू, तात्या विंचू’ हे बालनाट्य सादर करण्यात आले.




**पुस्तक परिचय ०००**

# सांजवात

## ढोंगी दुनियेत वावरायचे तर मुखवटे हवेतच.

**वि. स. खांडेकर**

सांजवात हा भाऊसाहेब खांडेकर यांचा सात कथांचा संग्रह १९४८ साली प्रथम प्रसिद्ध झाला. सहा वर्षांच्या कालावधीनंतर खांडेकर पुन्हा कथालेखनाकडे वळले म्हणून एका वाचकाने 'आमचे कथालेखक खांडेकर थडग्यातून बाहेर आले, हे पाहून मला झालेला आनंद व्यक्त करण्याकरीता हे पत्र पाठवत आहे,' असे त्यांना कळवले. अनेक समीक्षकांनीही खांडेकर संपले, खांडेकरांचे युग संपले, त्यांच्या प्रतिभेचे घट रिते झाले असे अधूनमधून त्यांना चिमटे घेतले... 'सांजवात' च्या अखेरीला जोडलेल्या 'दोन शब्द' मध्ये त्यांनी आपल्या सहा वर्षांच्या या कथालेखनातील संन्यासाच्या, खंड पडण्यामागच्या कारणांची मीमांसा करताना अनेक शक्यता सूचित केल्या आहेत. या काळात आपण कथा लिहिण्याचा प्रयत्न केला पण त्या कथा अर्धवट राहिल्या. त्या कथांमधला आशय स्वत:लाच लटका, फुसका, दिशाहीन, अर्थहीन वाटू लागला. तेव्हा त्या कथा पूर्ण करण्याएवढा उत्साहचा पूर्ण विश्वास नसेल तर त्या लेखनाचा, जीवनदर्शनाचा सगळा डोलाराच उन्मळून पडतो. खांडेकरांसारख्या संवेदनशील लेखकाला अशा 'निर्जीव' कथांमध्ये स्वारस्य न वाटणे हे स्वाभाविकच!

शिरोडा हे गाव सोडून चित्रपटकथा लिहिण्यासाठी खांडेकर कोल्हापूरला स्थायिक झाले; त्यामुळे शिरोड्याचा समुद्र आणि शिरोड्याची टेकडी यापासून ते दुरावले. त्या समुद्राच्या व टेकडीच्या सानिध्यात खांडेकर रमत आणि नवनव्या कल्पनांनी त्यांच्या प्रतिभेला स्फुरण चढे. भराभरा लिहून होई. कोल्हापूरला आल्यावर हे त्यांचे दोन नैसर्गिक मित्र त्यांना पारखे झाले आणि त्याबरोबर कथा लेखनाचे त्यांचे प्रयत्नही अर्धवट राहू लागले. कोल्हापूरला आल्यावर १९४१-४२ च्या सुमाराला आठ जून ही लघूकथा पूर्ण करून पुन्हा कथांचा झपाटा सुरू करायचा त्यांचा मनोदय - त्यामुळे पूर्ण होणे दुरापास्त झाले. त्यावेळच्या महायुद्धकालीन वातावरणानेही या लेखनप्रक्रियेत व्यत्यय आणला. युद्धामुळे घडलेला संहार, माणुसकीची मुस्कटदाबी, युद्धात लुळ्यापांगळ्या झालेल्या सैनिकांची दुरवस्था, आर्थिक ससेहोलपट,




टंचाई अध:पात, माणसाच्या मुखवट्याआड दडलेला हिंस्त्र भेसूरपणा - या सर्वांमुळे खांडेकरांच्या अंत:करणाची घुसमट सुरू झाली. त्यांचे ध्येयवादी, मानवतावादी, स्वप्नाळू मन घायाळ झाले. पापाचा पैसा हा सर्वत्र प्रतिष्ठेचा झाला. प्रत्येक माणूस स्वत:चा आत्मा शारीरिक सुखासाठी सैतानाला विकायला उतावीळ झाला आहे असे त्यांना जाणवले. लाचलुचपत, वशिलेबाजी, फसवणूक, नाडवणूक या शब्दांना उंची अत्तरांच्या पिपात बुचकळून काढल्यासारखी दरवळ येऊ लागली. आणि या सामाजिक पापाचा संसर्ग भारतीय समाजाचा पायाच खिळखिळा करीत आहे, सगळी सोनेरी स्वप्ने भंग पावली आहेत या भावनेने खांडेकरांची लेखणीच चालेनाशी झाली.

'लेखक या नात्याने आपल्या पायाखालची वाळू पदोपदी वाहून जात आहे, तिथे एक खोल खड्डा निर्माण होत आहे या जाणिवेने माझे दुबळे मन बेचैन होऊन गेले' असे ते म्हणतात (९४). त्यामुळे पूर्वीचे आवडते विषय एकदम जुने वाटू लागले. संकल्पित कथानके दुबळी दिसू लागली. या बेचैनीतून बंडखोरपणाकडे वळून गॉर्की, एमिल झोला, अप्टन सिंक्लेअर यांच्याप्रमाणे नवे काही आव्हानात्मक लिहणे, त्यासाठी कशी झुंज द्यावी हेच उमगेना. तसा आत्मविश्वास वाटेना. साहजिकच त्यांच्या लेखणीने मौनव्रत धारण केले - असे त्यांनीच प्रांजळपणे लिहिले आहे.

या बदलत्या परिस्थितीने खांडेकरांना अस्वस्थ केले. यंत्रयुगाने निर्माण केलेल्या कृत्रिम, बहिर्मुख व स्पर्धाप्रधान जीवनक्रमामुळे क्षणभंगुर सुखांचे पोकळ फुगे फुगवण्यात यूरोप-अमेरिकेतील माणसाची जीवनशक्ती वाया जात आहे, ॲटम बाँबसारख्या शोधांनी जगावर संहाराची कृष्णछाया पसरत आहे, मनुष्य मनुष्याचाच नव्हे तर स्वत:चाही वैरी झाला आहे, धर्म अधर्माच्या, स्वर्गनरकाच्या जुन्या कल्पनांचा, माणसाला नीतिमान राहण्यास प्रेरक ठरणाऱ्या कल्पनांचा धाक नष्ट झाला आहे. आणि सर्वत्र कलहाचे, अशांतीचे व लढाईचे वातावरण फैलावत आहे; माणसाच्या मनाच्या रणांगणावरही सत् आणि असत्, आत्मा आणि शरीर, श्रेय आणि प्रेय, सामाजिक आणि वैयक्तिक यांच्यात युद्ध चालू आहे. बुद्धीची नीतीपासून फारकत झाल्याने माणूस वैयक्तिक ज्ञानसंपादनात प्रगत होत आहे पण त्याचे सामाजिक मन मात्र रानटी युगातच रेंगाळत आहे - यासारख्या विचारांनी खांडेकरांची जीवनदृष्टी सैरभैर झालेली होती. समाजवादाकडे ते विषमतेच्या रोगावरचे औषध म्हणून पाहत होते, पण त्यासाठी जुन्या समाजरचनेचा विध्वंस होऊन अधिक तत्त्वनिष्ठ, प्रामाणिक, निरामय, निकोप माणसाची निर्मिती व्हायला हवी - अशीही अपेक्षा ते करीत होते. नव्या जीवनश्रद्धांचा शोध घेण्याची व आदर्श जीवनप्रणालीच्या आगमनाची आपली हौस ते कथांच्या कल्पनाविश्वात पूर्ण करून घेण्यासाठी उत्सुक होते.

'सांजवात' हे शीर्षक असलेली कथा खांडेकरांच्या बदलत्या मानसिकतेची कल्पना देणारी आहे.

यातील निवेदक वसंत हा बी. ए. झाल्यावर एका इन्शुरन्स कंपनीत काम मिळाल्याने पुणे सोडून लाहोरला स्थलांतर करतो. विवाह करतो. लाहोरला दंगली सुरू होतात तेव्हा तो



## ज्याला देव म्हणायचे त्याच्यावर पूर्ण भाव ठेवायचा. जो मार्ग पत्करला त्यावरूनच अव्यभिचारी निष्ठेने वाटचाल करीत रहायची.

पुण्यातील आपल्या कॉलेज मित्राला, दिनकरला भेटायला येतो. हा दिनकर एमएस्सी होऊन बेचाळीसच्या आंदोलनात भाग घेतो. बाँब खटल्यात तुरुंगात जातो. पुढे स्वातंत्र्य मिळाल्याने त्याची तुरुंगातून सुटका होते. आपल्या प्रेयसीशी, अरुणाशी लग्न करून संसार थाटतो. तो दिनकरला म्हणतो, ''आज तू गांधींच्या सारखी प्रार्थना कर. तुझा मित्र आगीत जळाला नाही, गोळीला बळी पडला नाही, दंग्यात मेला नाही म्हणून तू परमेश्वराचे आभार मान. गांधीजींच्या अहिंसेवर श्रद्धा ठेवणारे आम्ही सर्वजण मूर्ख ठरलो.'' दिनकर हा कम्युनिस्ट. तो वसंतला म्हणतो, ''तुझी-माझी श्रद्धा आणि गांधींची श्रद्धा यात मोठा फरक आहे. तुझी माझी श्रद्धा दुबळेपणाच्या पोटी जन्मली; गांधींची आत्मिक शक्तीतून... बंड करून ब्रिटिश सत्ता नेस्तनाबूत करण्याची शक्ती तुझ्यामाझ्यात नव्हती. म्हणून गांधीजींच्या अहिंसेचा मार्ग तुम्ही आपला मानला.''

दिनकर व अरुणा यांच्यात जोरजोरात चाललेली चर्चा विश्रांती घेणाऱ्या वसंतच्या कानावर येते. वसंताबरोबर चित्रपटाला जाण्याचे दिनकर टाळतो म्हणून अरुणा त्याला सांगत असते, ''तुम्ही का येत नाही ते मला ठाऊक आहे. तुळशीपाशी सांजवात लावायला चुकेल म्हणून... एखाद्या खेड्यातल्या भोळ्या बाईसारखे नेमाने तुळशीपुढे सांजवात काय लावता ?''

तेव्हा वसंता म्हणतो, ''प्रवासाने माझं अंग आंबून गेलंय. आज इथंच घरीच गप्पा मारू.'' तेव्हा दिनकर सांजवातीची कहाणी त्याला सांगतो. ''आठ ऑगस्ट १९४२ रोजी गांधीजी राष्ट्राला करेंगे या मरेंगे हा संदेश देत होते. त्यावेळी मी व अरुणा एक इंग्रजी चित्रपट बघत होतो. त्यातले प्रेमप्रसंग पाहून उत्तेजित होऊन एकमेकांची चुंबने घेत होतो. दुसऱ्या दिवशी मी बाँब तयार करण्याच्या गटात सामील झालो. चित्रपटगृहात बाँब ठेवायचा कट शिजला. चिठ्ठ्या टाकण्यात आल्या. माझे नाव निघाले. भीती वाटू लागली. त्यावेळी आजारी आई त्याचे हात हातात घेऊन म्हणाली, ''दिनू देवाघरची हाक मला ऐकू येत आहे. माझी एकच इच्छा उरलीय. धाकटी सून घरात आलेली आहे, तिने लावलेल्या सांजवातीला नमस्कार करावा आणि तुझ्या मांडीवर डोकं ठेवून..'' आईच्या हातात तुळशीच्या मंजऱ्या असतात.. ती पुढं म्हणाली,''तुझ्या बायकोनं कुठल्याही देवाची पूजा केली तरी मला चालेल. हवा तो देव तू मान, पण ज्याला देव म्हणशील त्याच्यावर भाव ठेव. त्याच्याच पूजेकरिता प्राण द्यायची पाळी आली तर...'' आणि आई त्याला आपण थोरातांच्या कुळातील आहोत याचे स्मरण देते. ''रखेली होण्यापेक्षा मरण पुरवलं म्हणून संभाजीनं पळवून आणलेल्या आपल्या कुळातल्या पोरीनं किल्ल्याच्या तटावरून खाली दरीत उडी मारून जीव दिला, त्या सतीची आठवण म्हणून आपल्या कुळात संध्याकाळी तुळशीपाशी सांजवात ठेवण्याची चाल पडली आहे. दु:खात, संकटात, काळोखात तीच तुला वाट दाखवील.''



दिनकर त्या दिवशी स्वत: तुळशीपुढं सांजवात लावतो... रात्री आईला नमस्कार करून थिएटरमध्ये बाँब ठेवण्याचे काम चोख बजावतो. पण एका सहकाऱ्याच्या चुकीमुळे पोलिसांच्या हाती तो लागतो. खटला चालू होतो. त्याचे आप्त त्याला माफी माग म्हणून सांगतात. तेव्हा त्याला आई भेटून सांगते, ''थोरातांच्या कुळात जन्माला येऊन माफी मागणाऱ्या दिवट्या पोराची आई म्हणवून घ्यायला मी तयार नाही. थोराताच्या कुळाचं मोठेपण, आपल्या जातीचं शील...'' दिनकर तिच्या त्या शब्दांनी आश्वस्त होतो. ''आई, कुणी उभा जाळला तरी तुझा दिनू माफी मागणार नाही. तुझी ही आसव त्या आगीचे चटके मला लागू देणार नाहीत.'' दिनकर तुरुंगात असतानाच आईचे देहावसान होते. दिनकरची नंतर सुटका होते सांजवात लावण्याचे त्याचे व्रत चालू राहते. कम्युनिस्ट विचारसरणीने भारलेली अरुणा - तीही या सांजवातीच्या व्रताची परंपरा चालवण्यास सिद्ध होते.

- खांडेकरांना बदलत्या वातावरणातही आपल्या जुन्या जीवनमूल्यांचीच ओढ अस्वस्थ करीत होती. सांजवातेमागची भावना, घराण्याचा अभिमान, आईची अस्मिता यांच्यापुढे इतर सर्व गोष्टी तुच्छ ठरतात. 'कम्युनिस्ट' अरुणाही या भावपूजेत सहभागी होते. 'समाजवादी' दिनकरचा बुद्धिप्रामाण्यवादही फिका पडतो. सर्वात शेवटी संदेश उरतो तो एकच! ज्याला देव म्हणायचे त्याच्यावर पूर्ण भाव ठेवायचा. जो मार्ग पत्करला त्यावरूनच अव्यभिचारी निष्ठेने वाटचाल करीत रहायची.


हा संदेश म्हणजे बदलत्या जमान्यात देखल्या देवाला दंडवत घालणे नव्हे; वा वारा येईल तशी पाठ फिरवणे नव्हे.

खांडेकर बदलत्या जमान्यामुळे व बदललेल्या मूल्यांमुळे अस्वस्थ होते; पण त्यांची आपल्या पूर्वस्वीकृत जीवनमूल्यांवरची श्रद्धाच कायम होती. संभ्रमावस्थेत मनाची चलबिचल होऊन लेखनात व्यत्यय येत होता. परंतु लिहून होत होते ते आपल्याला प्रथमपासूनच रुचत आलेल्या आदर्शांचेच नवे रूप दर्शन स्पष्ट करणारेच होते.

'तुळस हे स्त्रीच्या गुलामगिरीचे चिन्ह आहे' असे 'सोन्याची गाडी'मधील दादासाहेबांची पत्नी म्हणते; आणि दादासाहेबांचे तुळस पवित्र असल्याचे विधान खोडून काढते. दादासाहेबांना मंत्रीपद मिळते. सोन्याची गाडी दारात उभी राहते. आपल्या मंत्रीपदाच्या श्रेयाचे वाटेकरी कोण याबद्दलची एक विचारमालिका त्यांच्या डोळ्यांपुढून सरकते.

आपले वडील ? शिक्षक ? बायकोच्या निधनानंतर ही सावत्रपणाचा जाच होऊ नये दुसरे लग्न न करणारे. हेडमास्तर हो म्हणणारे. छे! आपले सासरे ? त्यांच्या वकिलीतील अग्रस्थानामुळे आपला वकिलीत जम लौकर बसला. गांधीजींच्या सहवासाचा योग आला. राजकीय क्षेत्रात पत्नीमुळे प्रवेश सुलभ झाला. वकिली व देशभक्ती दोहोंचा मेळ बसला. आज सासरे हयात असते तर दादासाहेबांनी त्यांना अभिमानाने म्हटले असते, ''आज मी तुमच्या ऋणातून मुक्त झालो. तुमची कन्या ही फक्त एका श्रीमंत वकिलाची मुलगी होती. पण आज ती एका बड्या मंत्र्याची बायको झाली आहे...''

-आणि या आत्मगौरवाच्या शिखरावरून दादासाहेब लगेच खाली येतात. कारण पोलिस



## जोपर्यंत अर्धवट श्रद्धा ठेवणाऱ्यांचीच संख्या जास्त आहे, तोपर्यंत मार्ग दाखवणाऱ्या विचारवंतांची उपेक्षाच होणार

चौकीतून फोन येतो, ''तुमच्या मुलाने दारूच्या धुंदीत एका बाईच्या पायी हॉटेलात मारामारी केलीय... एका माणसाला भयंकर जखमा झाल्या आहेत...''

त्यावेळी 'सोन्याची' ती गाडी श्रीपतीला भिकार खटाऱ्यासारखी वाटते; आणि त्यात बसवून दादासाहेबांना आपण फाशी गेटकडे नेत आहोत असा विचार त्याच्या मनात येतो.

'दोन मोसंबी' मधील कविराज संपादकाला आपली कविता देऊन वाचायला सांगतो. 'माझी भाची आजारी आहे. तिच्यासाठी मोसंबी आणायची आहेत. ही कविता घ्या, आणि पाच रुपये द्या.''

संपादक म्हणतात, ''महाकाव्य लिहून उभ्या जन्मात मिळणार नाहीत एवढे पैसे खुनाच्या वा व्यभिचाराच्या बातम्या देऊन मिळतील. कवितांऐवजी तू बातम्या लिही, बातमीदार हो... माझ्याकडे बघ. वीस वर्षात हा छापखाना, ही इमारत, उसाचा मळा... तू फक्त आकाशातल्या चांदण्या मोजत बसला आहेस.''

''काव्य, सौंदर्य, भावना, माणुसकी - ज्या ज्या गोष्टींची आपण जन्मपासून पूजा करीत आलो त्यांना आजच्या जगात स्थान नाही. जीवनाच्या विशाल वृक्षाला जिकडे तिकडे विषारी फळेच लटकली आहेत.'' असे कवीला वाटले.

रस्त्यावरून जाताना पोलिस त्याला अडवतो. झडती घेतो. ''लेका, अपरात्री असा बाहेर कशाला भटकत होतास ? तोंडाला दारूचा वास नाही. खिशात चोरीचा माल नाही. कुठल्या तरी बदचाल बाईची भर करून आला असशील. चल पलीकडच्या चौकीत. बैस तिथं उजाडेपर्यंत.''

तिथं त्याला थोटा जगू भेटतो. तो आपली कहाणी ऐकवतो. बाळासाहेबांबरोबर पिक्चरला आलेली बाई आपल्या पत्नीसारखी दिसली म्हणून तो तिला नीट बघू पाहतो. तिच्या खांद्यावर हात ठेवतो. तर त्याला पकडून पोलिसाच्या ताब्यात देण्यात येते. त्याची ही कहाणी ऐकून कवी सुन्न होतो. तेवढ्यात केस विस्कटलेली बाई चौकीत येते व जगूला म्हणते, ''माफ करा धनी. मी बाळासाहेबाला सोडून आलेय. मला पदरात घ्या.''

खांडेकरांची कल्पनाशक्ती कशी स्वैर स्वच्छंद संचार करते याचे अफलातून नमुने वाचकांना थक्क करतात. या कथेत पुढे काय होते ?

घरी गेल्यावर कवीला भाचीचा ताप उतरलेला दिसतो. ती कवीला सांगते, ''मामा, काल रात्री स्वप्नात एका राक्षसाने मला पकडून एका बागेत नेऊन ठेवले. त्याला झोप लागल्यावर मी एका मोसंबीच्या झाडावर चढले. झाडाने मला दोन मोसंबी दिली. ती मोसंबी हातात घेतल्यावर मला पंख फुटले. मी हवेत उडू लागले... आता बघतेय तर मला पंखही नाहीत



अन् तापही नाही.''

कवी तिला म्हणतो, ''त्या दोन मोसंब्यांची नावेही मला ठाऊक आहेत. एकाचं नाव जगू. दुसऱ्याचं शेवंती... मीही स्वप्नात त्या बागेत गेलो होतो.''

एकीकडे व्यवहारी जगाशी तडजोडीचा सल्ला देणारा संपादक, दुसरीकडे स्वत:च्याच पत्नीचा हात धरणारा जगू- पोलिसांच्या तावडीत, केवळ अपरात्री रस्त्यावर फिरल्याबद्दल कवीला पोलिसांने दाखवलेली चौकी आणि तापाने फणफणलेल्या भाचीच्या स्वप्नातले मोसंब्याचे झाड - असा स्तिमित करणारा मालमसाला खांडेकरांसारखा कसलेला कथाकारच एका मुशीत टाकून वाचकांच्या भावजाणिवेच्या कक्षांचे विस्तारीकरण साधतो.

या संग्रहातील शिखर, शांती, दोन भुते या रूपककथा छोट्या पण जीवनभाष्याच्या दृष्टीने मोठ्या अर्थपूर्ण आहेत. बाह्य भपक्याने आणि फसव्या जीवनमूल्याने मनुष्याला दु:खच पत्करावे लागते; अर्धवट श्रद्धेने जगणाऱ्यांची संख्या जगात जास्त. त्यामुळे विचारवंतांच्या वाट्याला उपेक्षाच येणार माणूस, घार व सर्प यांच्या स्नेहाचे, शांतीचे अकल्पित दर्शन घडल्यामुळे प्रभूच्या लीलेचे गुणगान करणाऱ्या साधूला डोळे उघडून बघितल्यावर दिसलेली त्या तिघांची प्रेते. अशा आशयाच्या या रूपककथा एका अर्थाने भ्रमनिरासाचेच निरुपण करतात.


खांडेकरांच्या जीवनदृष्टीला अशा नकारात्मक दृश्यांनी अस्वस्थ केले हे खरे; पण जन्मजात आशावाद व मानवतावाद यांचे अधिष्ठान शोधण्याचा त्यांचा प्रयत्न अखेरपर्यंत चालूच राहिला हेही लक्षात ठेवायला हवे. 'सांजवात' द्वारे हे आपल्या मनावर चांगले ठसते. आपल्या मनोगताच्या शेवटी ते म्हणतात, ''या गोष्टी लिहिण्यापूर्वीच्या काळात कोणी तत्त्ववेत्ता मला भेटता तर त्याला मी म्हटले असते - मी वेडा होईन असं काहीतरी मला सांगा. आता मला कुणी तसा गुरू भेटला तर मी त्याला विनंती करीन. मी शूर होईन असं काहीतरी मला शिकवा.''

- वाचकांनाही शूर, धीरगंभीर व्हायला सांगणारा हा कथासंग्रह आहे.

**पृष्ठे : ११२ ● किंमत : ६० रु. ● सभासदांना : ४५ रु. ● पोस्टेज : २० रु.**

### खांडेकरांची इतर वाचनीय पुस्तके

| | | | |
|---|---|---|---|
| स्वप्न आणि सत्य | ७० रु. | पहिले प्रेम | ९० रु. |
| विकसन | १०० रु. | पाकळ्या | ७० रु. |
| रानफुले | ७० रु. | सूर्यास्त | ३० रु. |
| सरत्या सरी | ५० रु. | यज्ञकुंड | ३० रु. |
| अजून येतो वास फुलांना | ६० रु. | मध्यरात्र | ४० रु. |
| भाऊबीज | १२० रु. | घरटे | ३० रु. |
| क्षितिजस्पर्श | ८० रु. | अस्थी | ३० रु. |
| सुवर्णकण | ८० रु. | अबोली | ५० रु. |




# शिवणकला - एक छंद

सलवार कमीज, स्कर्ट ब्लाऊज, इव्हिनिंग गाऊन्स, मिडी

**भरपूर नमुने, अनेक फोटो, आकृत्यांसह अनुभवसिद्ध मार्गदर्शन**

**हेमा कळके**

सध्याचे युग हे फॅशन्सच्या सुवर्णकाळाचे आहे. फॅशन्समधील विविधतेने आपल्या नेत्रांचे पारणे फिटते. आंतरराष्ट्रीय पातळीवरच्या अद्ययावत फॅशन्स टेलिव्हिजनद्वारे आपल्याला बघायला मिळतात; आणि आपल्या देहाला असे नावीन्यपूर्ण कपडे किती आकर्षकपणे सजवू शकतात याचेही नवनवे साक्षात्कार घडत राहतात. एकेका ड्रेसची किंमत शेपन्नासपासून हजाराच्या, लाखाच्या घरात जाऊ शकते. सोन्याचांदीच्या पत्र्यापासून हिऱ्यामाणकांची कलाकुसर त्यात होऊ शकते, कागदापासूनही नेत्रदीपक फॅशनेबल कपड्यांची निर्मिती होऊ शकते - आपली तर मतीच गुंग होते. फॅशनच्या जागतिक पातळीवरच्या उलाढालींचा व्याप प्रचंडच. पण आपण भारतातल्या साड्यांचा जरी विचार केला तरी त्यातील विविधता व हजारो-लाखो डिझाइन्स आपल्याला थक्क करून टाकतात. दुकानात शेकडो प्रकारच्या एकापेक्षा एक भारी साड्या बघताना, आपल्या बजेटच्या मर्यादांचेही विस्मरण घडते. किती घ्याव्यात किती नाही असा प्रश्न पडत गोंधळ उडतो. एक साडी घेतानाही शेकडो साड्या बघून डोळ्यांना अपार सुख दिले जाते. बऱ्याच बायका अशा या नेत्रसुखामुळे अत्यंत तरतरीत होतात!

अर्थात आता साड्यांच्या बरोबरीने सलवार कमीज, स्कर्ट ब्लाऊज, गाऊन्स, मिडी-मॅक्सी यांचाही मोठ्या प्रमाणावर वापर होऊ लागला आहे; आणि साडीच्या सहा-नऊ वाराच्या घेरदार पसाऱ्यातून अधिक सोयीस्कर सुटसुटीत पर्यायाकडे युवतींचा कल जास्त दिसू लागला आहे. सलवार-कमीजची वेगवेगळी रूपे सातत्याने समोर येत आहेत आणि त्यांच्या कलात्मक रंगसंगतीने स्त्रीदेहाची रेखीव कमनीयता आणखीनच खुलून येत आहे. 'ब्युटिक' मध्ये अशा फॅशन-डिझाइन्ड' सलवार कमीज वा ड्रेसच्या खरेदीला गेले की प्रचंड किंमतीचा त्यावरील 'प्राइस टॅग' बघून अनेकदा मनावर नैराश्याने सावट पडते. ब्रॅंड नेममुळे साध्या साध्या ड्रेसच्याही किंमती भरमसाट ठेवल्या जातात, आणि ते खरेदी करणे आपल्या आटोक्याबाहेर आहे असे जाणवते. कधी कधी हे असे कपडे आपण घरीच शिकू शकतो आणि ते अत्यंत



अल्प खर्चात - असेही वाटत राहते. ते खरेही असते. शंभर रुपयाच्या कापडाचा ड्रेस ब्रॅंड नेमखाली आला की हजार-पंधराशेचा प्राइस टॅग ठेवून येतो. कारण किंमत जितकी जास्त तेवढी ती वस्तू अधिक मौल्यवान, फॅशनेबल आणि ती नेसून मिळणारा अभिमान मोठा - ही आपली मानसिकता असते. भारी शालू नेसला की आपल्या साध्या पावलांनाही एक डौलदार लय येते. सभासंमेलनातला खानदानीपणा प्रत्येक छोट्यामोठ्या हालचालीतून उमटतो.

तर इथे लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे स्वत:च जर आपण आपले ड्रेस डिझाइन करून शिवायचे म्हटले तर अगदी अल्प खर्चात मोठी धमाल उडवता येते. भारी दुकानातले भारी कपडेच त्यासाठी घ्यायला हवेत असे नाही.

या दृष्टीने मुंबईच्या हेमा कळके यांनी सादर केलेले 'शिवणकला - एक छंद' हे पुस्तक उत्साही तरुणींचे हजारो रुपये वाचवणारे ठरेल. त्या गेली १५ वर्षे बायकामुलींना शिवणकाम शिकवतात. सलवार कमीजचे शेकडो पॅटर्न त्यांनी तयार केले. ते आत्मविश्वासाने क्लासमधील बायकामुलींना हाताळता यावे म्हणून त्यांचे पेपर पॅटर्न करून, कपडे बेतणे व कापणे यामध्ये बिनचूकपणा व बिनधास्तपणा आणला. 'चुका आणि शिका' हा मंत्र त्यांनी स्वत: आचरणात आणला. परंतु आपल्या क्लासमधील विद्यार्थिनींना मात्र व्यवस्थित पॅटर्न तयार करून अचूक ड्रेस तयार करा असाच मंत्र त्यांनी दिला आणि तो प्रत्यक्षात आणून दाखवला. सलवार कमीजच्या क्षेत्रातही जपानी चिनी ड्रेस पॅटर्ननी कल्पनाशक्तीला नवी चालना मिळू शकते, हेही त्यांना जाणवले. आणि आपल्या या ज्ञानाचा व अनुभवाचा फायदा क्लासपुरता मर्यादित राहू नये म्हणून त्यांनी पुस्तकरूपाने तो सर्वांसाठी उपलब्ध करून दिला आहे. आपण उत्तम शिवू शकतो असा आत्मविश्वास आाणि आनंद सर्वांना देऊ शकेल असे हे पुस्तक आहे.

स्वत:साठी कपडे शिवणे हा एक आनंदाचा व अभिमानाचा विषय आहेच; परंतु कपडे शिवण्याचा व्यवसाय करून संसारालाही चांगला हातभार लावण्याची संधी त्यामुळे मिळू शकत, याकडे लक्ष वेधले आहे.

हेमा कळके यांनी प्रथम शिलाईसाठी कपडा घेतल्यापासून काय काय करावे याबद्दलच्या सूचना अत्यंत सोप्या शब्दात आणि नेमकेपणाने दिल्या आहेत. उदा. ज्या व्यक्तीसाठी कपडा शिवायचा त्या व्यक्तीची आवश्यक ती मापे शक्यतो अंगावरून घ्या. पेपर पॅटर्न करताना कागद लहान पडला तर कागदाला कागद डिंकाने चिकटवून घ्या. कागदावर आकृती नेहमी दुहेरी कागदावर आणि घडीवर काढा, म्हणजे एक भाग मागचा व एक पुढचा आपोआप मिळतो. कापडाचा पन्हा सामान्यत: ३६ इंच असतो. जास्त पान्ह्याचे कापड असेल तर लेआउटमध्ये फरक पडतो. बाह्या लावताना डाव्या उजव्या बाजूच्या बाह्या कोणत्या याकडे नीट लक्ष द्या. तिरकस पट्ट्या जोडताना तिरक्याच व एका दिशेने जोडा. गोलाकार भागाला लेस लावताना किंवा चौकोनी योकला लेस लावताना कोपऱ्याच्या दोन्ही बाजूंना बारीक चुण्या घेणे आवश्यक असते. कपडा पूर्ण झाल्यावर त्याला ओव्हरलॉकिंग करून आणा. सर्व ठिकाणी दुहेरी शिलाई घालावी म्हणजे कपडा उसवणार नाही. इ.

मापे कशी घ्यावी याबद्दल अनेक सूत्रे स्पष्ट केली आहेत. सलवार कमीज यासाठीचे पॅटर्न्स




## स्वतःच जर आपण आपले ड्रेस डिझाइन करून शिवायचे म्हटले तर अगदी अल्प खर्चात मोठी धमाल उडवता येते.

क्रमाक्रमाने सोप्याकडून गुंतागुंतीचे होत जातील अशी रचना केली आहे.

पुस्तकात १६ आर्ट प्लेटसवर वेगवेगळ्या डिझाइन्सच्या ड्रेसेसचे रंगीत नमुने देण्यात आले आहेत. त्यात सलवार कमीज, ओव्हरलॅप, स्टँड कॉलर, हायनेक, कळ्यांचा घेरदार कमीज, मॅग्यार कमीज, साडीतून सलवार कमीज, चुडीदार कमीज, इव्हिनिंग गाऊन, पॅरलल पँट, स्कर्ट-जीन्सवरचा टॉप, अंब्रेला स्कर्ट, मिडी यांचे हे नमुने आकर्षक वाटतील असेच आहेत.

रेडीमेड कपड्यांसाठी दामदुप्पट पैसे खर्च करण्यात आणि शॉपिंगचे नेत्रसुख लुटण्यात एक थ्रिल असतेच, परंतु घरच्या घरी अल्प खर्चात वेगवेगळे मनाप्रमाणे तयार करण्यातला आनंदही आगळाच असतो. त्यासाठी हेमा कळके यांच्या या पुस्तकाची चांगली मदत होऊ शकेल.

**पृष्ठे : १०४ ● किंमत : ८० रु. ● सभासदांना :६० रु. ● पोस्टेज : २० रु.**

**चंद्रकला प्रकाशन - दर्जेदार साहित्याची हमी !**

आमचे नवीन पुस्तक

माझं पुस्तक

लेखिका
**शशिकला उपाध्ये**

पुस्तकाच्या आणि साहित्याच्या प्रेमातून प्रकाशनाच्या क्षेत्रात आलेल्या एका प्रकाशिकेचं हे 'अनुभव लेखन' म्हणजे वीस वर्षांतील बऱ्या वाईट अनुभवांचं ललित शैलीतील प्रांजळ कथन!
साहित्य आणि प्रकाशन व्यवसायातील थोर व्यक्तींच्या सहवासातील अविस्मरणीय अनुभव. साहित्य निर्मितीतला निखळ आनंद आणि प्रकाशन व्यवसायाचं आजचं स्वरूप आणि समस्याही !
प्रत्येक व्यक्तीनं वाचलं पाहिजे असं आत्मकथन !

पृष्ठे : २८०    किंमत : रु. २५०/-

**संपर्क** - १३८ कसबा पेठ, पुणे ४११ ०११.
दूरध्वनी : ४४५५५७४, ४२८३८७५






## प्रेममयी

## देहरुपी मंदिरातल्या ईश्वरी चैतन्याच्या शोधात रंगलेल्या 'बाऊल'ची अनोखी जीवनशैली

**व. पु. काळे**

कथाकथनकार म्हणून व. पु. काळे सतत मानवी स्वभावावर प्रकाश टाकणाऱ्या मार्मिक, आकर्षक, अल्पाक्षररमणीय आणि विरोधाभासात्मक अशा अर्थपूर्ण वचन-वाक्यांच्या शोधात असत. सर्वांना सहज आकळेल नव्या वास्तवाचे भान देईल असे एखादे विधान श्रोत्यांपुढे आले की आणि उत्स्फूर्त टाळ्यांचा कडकडाट हा आपोआप येणारच याबद्दल त्यांची पक्की खात्री असे. त्यांच्या लेखनात अशी चटपटीत पण मर्मग्राही विधाने अगदी सहजपणे येतात; आणि श्रोत्यांना त्यामुळे गुदगुल्या होतात. पॅराडॉक्स - विरोधाभास, एपिग्रॅम्स - सुभाषितवजा वाक्ये यांच्यातले नाट्य श्रोतृवर्गाला मंत्रमुग्ध करते. एक वक्ता व कथाकथनकार म्हणून वपु श्रोतृवर्गाचा वेध घेणारे अनेक बाण आपल्या भात्यात सदैव सिद्ध ठेवत. त्याचप्रमाणे गमतीदार किस्से, नमुनेदार माणसांचे जगावेगळे स्वभावविशेष, चमत्कृतिपूर्ण निरीक्षणे यांचा ते नेहमी वापर करीत. अशा लेखनाचाच एक आदर्श ओशोंच्या पुस्तकांतून त्यांना गवसला. त्याच्याशी त्यांचे सौहार्द जुळले.

ओशोंच्या बिलव्हेड या पुस्तकात 'बाऊल' या अवलिया गायक नर्तक जमातीच्या अनुषंगाने मुक्त जीवनशैलीचा व आंतरिक ईश्वराच्या आराधनेचा वेध घेण्यात आला आहे. वपुंनी त्या आधारे दहा लेखांचे प्रेममयी हे पुस्तक सिद्ध केले आहे.

'बाऊल' हे गायक हातात एकतारी आणि गळ्यात चर्मवाद्य घेऊन नाचत-गात भटकंती करीत राहतात. आपलं शरीर हेच आपलं देऊळ आणि अंतरंगातल्या परमात्म्याचा शोध घेण्यातच खरी जीवनाची सार्थकता. कर्मकांड - तीर्थस्थळ - उपासतापास यापैकी कशालाही थारा नसलेली उत्स्फूर्त जीवनशैली. *'स्वत:ची वाट स्वत: निर्माण करा, पावलापावलांनी रस्ता होतो. मग परमेश्वर मिळतो. सत्य गवसते.'* अशी त्यांची श्रद्धा.

वपुंना 'बाऊल'चे मुक्त वागणे, मुक्त जगणे, नाचणेगाणे हे खूप भारावून टाकते. त्यांचे नैसर्गिक चैतन्य त्यांना मुग्ध करते. मला माझ्या पद्धतीनं जगू द्या. तुम्ही माझ्या मार्गात येऊ

नका. मी तुमच्या मार्गात येणार नाही अशी त्यांची जणू मागणी असते आणि तशीच वृत्ती लोकांनी आपल्याबाबतही ठेवावी अशी अपेक्षा वपुंची आहे. आहे हा क्षण आपला. तो पदरात पाडून घ्या. आताच्या क्षणात जगणे, म्हणजे आयुष्याचा महोत्सव साजरा करणे. बाऊल जीवनातल्या क्षणाक्षणाचे सार्थक करतात. एक क्षणही वाया घालवत नाहीत. आयुष्याबद्दल तक्रार करीत नाहीत. मृत्यूची चिंता वाहत नाहीत. आपल्यातील चैतन्याचा शोध घेणे एवढेच उद्दिष्ट असल्याने अमुक मिळाले, तमुक मिळावे अशी कुठलीच अपेक्षा नाही. खेद नाही. खंत नाही. कशातही जीव गुंतलेला नाही. बाऊल म्हणजे पूर्ण समर्पण. बाऊल प्रेमाला आत्म्याचा श्वास मानतात. त्यांच्या अंत:करणात प्रेम ओतप्रोत भरलेले असते.

अशा अशिक्षित पण समर्पित प्रेमभावनेने जगणाऱ्या बाऊलचे गुणगान ओशो मनापासून करतात. शुद्ध आणि पवित्र असं काही मानायचं असेल तर ते प्रेमच आहे. प्रेमातूनच आपला जन्म होतो. प्रेम असेल तिथे प्रेमिक अचूक पोहोचतो. म्हणून ओशो बाऊलना 'बिलव्हेड' प्रियतम असे संबोधतात. वपु त्यांना प्रेममयी म्हणतात.

अशी बाऊलची तरफदारी करताना वपु स्वत:च जणू बाऊलच्या मुशीत आपल्या स्वत:ला ढाळू पाहतात.

बाऊल शब्दांच्या मागं धावत नाही, तो नाचतो गातो. त्याचा देव त्याच्या स्वरात आहे. (३४)

'विचार करणं म्हणजे समजशक्तीचा अभाव. एखादी गोष्ट समजत नाही म्हणून माणूस प्रश्न विचारतो. आकलनशक्ती वाढली की विचार आपोआप मागं सरकतात. विचार करणं म्हणजे जुनेच प्रश्न पुन्हा पुन्हा विचारणं. जे अज्ञात आहे ते नुसत्या विचारांनी समोर येत नाही. अंडरस्टँडिंग म्हणजे अर्थबोध होणं. अंडरस्टँडिंग हे ताजं टवटवीत असतं. ते बुद्धीचं लक्षण आहे. (२८-२९), बुद्धिमत्ता हा तुमच्या अस्तित्वाला लाभलेला पैलू आहे. ध्यान आणि साधना या मार्गांनी बुद्धिमत्ता वाढवता येते. स्वत:च्या अस्तित्वाला अर्थ देता येतो. (३०) हे ओशोंचे विवेचन वपुंना आकर्षक वाटते. अर्थपूर्ण वाटते.

'नॅथींग हॅज हॅपन्ड, अँड नथींग वुईल हॅपन. व्हॉट इज देअर, इज देअर' ही बाऊलच्या संदर्भातील ओशोंची तीन सूत्रे वपुंना अशीच विचारांना चालना देणारी वाटतात. (३६) त्यातील विचार लक्षात आला तर तुम्ही वेदनामुक्त व्हाल, काळजीमुक्त व्हाल, निर्भय व्हाल असे वपु सांगतात. (४१)

ओशोंनी प्रणय, सेक्स याबद्दलही काही मते मांडली आहेत.

दि वर्ड सेक्स इज व्हेरी लोडेड. इट इज वन ऑफ दि मोस्ट लोडेड वर्डस इन एक्झिस्टन्स. यू से 'गॉड'. इट सीम्स एम्प्टी. यू से 'सेक्स'. इट सीम्स टू लोडेड.''

ओशो प्रणयभावनेला पारलौकिकत्व देऊ पाहतात. प्रणयभावना जेवढी दडपून टाकली जाईल तेवढी ती उफाळून येते. *''प्रणय ही एक स्वाभाविक हालचाल आहे. तो एक निखळ उत्सव असतो. परमेश्वरानं मानवाला दिलेलं हे सर्वात मोठ पारितोषिक आहे. प्रणयाला पारलौकिक करण्यासाठी तुम्ही काहीच करून नका. त्याचं मोकळ्या मनानं स्वागत करा. तुमच्या आलिंगनानंच तो पारलौकिक होतो.''* हे ओशोंचे मन वपुंना मार्मिक वाटते. (६१)





## ज्यावेळी तुम्ही जग आणि परमेश्वर, लालसा आणि प्रेम, कमळ आणि चिखल एकच आहे हे मान्य कराल तेव्हा तुम्ही बाऊल व्हाल.

प्रणयाच्या राज्यात समोरची व्यक्ती ही तुमच्यापेक्षा अधिक महत्वाची असते. प्रणयामध्ये समोरची व्यक्ती म्हणजे मुख्य ग्रह आणि आपण म्हणजे उपग्रह ही भूमिका स्वीकारणाऱ्या माणसांनाच प्रणयाची खरी चव कळते. (६२) प्रणयभावनेशी झुंज देणं अशक्यप्राय आहे. प्रणय पारलौकिक करणं म्हणजे संयम करून दाबून टाकणं नव्हे. तुमचा प्रणय जर यशस्वी झाला तर तुम्हाला हलकंफुलकं वाटेल. खऱ्या मानसिक शांतीचा साक्षात्कार होईल. उत्कटतेच्या बिंदूला स्पर्श करून येणं म्हणजे एक प्रकारचा पुनर्जन्मच ! (६३) अशी ओशोंच्या विचारांची मुख्य धारा वपु प्रकट करतात.

बाऊल जमातीतील प्रत्येक व्यक्ती ही जणू एका नवीन माणसाचा शोध घेत असते. जो आत्मरत झाला, आत्मरंगी लीन झाला तो खरा नवा माणूस... असा नवा माणूस हजारो वर्षातून एखादाच जन्माला येतो. बुद्ध, कृष्ण, ख्रिस्त - ही माणसं आपल्या साम्राज्यासकटच जन्माला येतात. बाऊल धर्म मानत नाहीत. नाचगाण्यात तल्लीन झाले की स्त्री-पुरुष भेदही त्यांच्यात उरत नाही. (७४)

बाऊल जित्याजागत्या माणसालाच केंद्रस्थानी मानतात. (दि गॉड इज लिव्हिंग इन मॅन) ज्यावेळी तुम्ही जग आणि परमेश्वर, लालसा आणि प्रेम, कमळ आणि चिखल एकच आहे हे मान्य कराल तेव्हा तुम्ही बाऊल व्हाल. (९१)

शरीरामध्ये तसं काही खास नाही, त्याच्यामध्ये जे आराध्यदैवत आहे, त्यामुळं शरीर रोषणाईनं झगमगत राहतं. बाऊल हे शरीराला कपाऊंडचं फाटक मानतात. त्यातून प्रवेश करून अंतर्मनाचा वेध घेतला म्हणजे चैतन्याचं, परमेश्वराचं, ज्योतीचं दर्शन होतं, असं बाऊल मानतात. (९५)

बाऊल भिकाऱ्यासारखा रस्त्यावरून चालताना दिसेल, पण त्याच्या अंतर्मनात दिवाळीसारखी रोषणाई असते. तो सगळ्या विश्वाचा प्रतिनिधी म्हणून नाचतो. तो शांत असतो. आपल्या जीवनात विरघळून गेलेला असतो. त्याची वैचारिक बैठक ''इथं -आत्ता' अशी आहे.

''रिलॅक्स अँड इट फुलफिल्स यू. रिलॅक्स अँड इट रशेस इन्टू यू. रिलॅक्स. इट ओव्हरफ्लोज् यू.''

''परमेश्वर प्राप्तीसाठी मी कधी प्रयत्न केला नाही तरी तो आहे.मी भीक मागितली नाही तरी तो आहे.'' (९७)

म्हणून कुठल्याही वस्तूच्या मागं बाऊल धावत नाही. सुख मिळवण्यासाठी तो कुठंही पळापळ करीत नाही. (९८)

प्रेमाच्या धाग्यानं हे विश्व जोडले गेले आहे असे बाऊल मानतात. कॉमन मॅनला अनकॉमन बनवण्याची ताकद फक्त प्रेमात आहे, प्रत्येक माणसाला पूर्णत्व देण्याची ताकदही फक्त

प्रेमातच आहे, लोकांचा सगळा जीवनक्रम लाइफ, लव्ह ॲण्ड लाइट या तीन 'एल' वर चालतो असे ओशो यांचे प्रतिपादन आहे.

बाऊल प्रेमाकडे एक विशिष्ट तंत्र म्हणून पाहतात. 'तुम्ही समोरच्या व्यक्तीशी एकरूप होता आणि तरीही तुमचं अस्तित्व वेगळं आहे अशी तुम्हाला जाणीव असते. या अशा प्रेमालाच एक विशिष्ट तंत्र असं बाऊल मानतात. हे तंत्र शिवशंकरांनी दिले. आर्यांनी ही धारणा मोडीत काढली. शिव म्हणजे तंत्र. त्या तंत्राची उपशाखा म्हणजे बाऊल' (११५) असेही प्रतिपादन ओशोंनी केलेले आहे.

राहण्यातला सुटसुटीतपणा, विचारांचा नेमकेपणा आणि निर्णय घेण्याचं सामर्थ्य (कन्झाइझनेस, प्रिसिझन अँड डिसिझन) हा बाऊल लोकांचा स्थायीभाव आहे. (११७)

''बाऊल समाजातील व्यक्तींना सदसद्‌विवेक बुद्धी असते, पण व्यक्तिमत्त्व नसते.'' असेही एक प्रथम दर्शनी वैचित्र्यपूर्ण वाटणारे विधान ओशो करतात. ज्या माणसाजवळ विवेकबुद्धी आहे, त्याच्या बाबतीत स्वभाव ही गोष्ट दुय्यम. उपजतच तो स्वभाव आहे त्यानुसार माणूस वागतो ते स्वाभाविक.

ओशोंच्या 'बाऊल' विषयक विचारमंथनाचा वपुंनी आपल्या शैलीत घडवून दिलेला हा परिचय. आंतरिक ईश्वराला साद घालणारा, बाह्यजगातील व्यावहारिक यशापयशाची फिकीर न बाळगता आत्मरंगी नित्य लीन असणारा बाऊल म्हणजे समर्पणभावाचे परम रूप. त्याचे आवाहन व आकर्षण बऱ्याच भल्याबुऱ्या अनुभवांच्या चक्रव्यूहातून गेलेल्या वपुंना 'बाऊल'च्या रूपातील उत्स्फूर्तपणे जगणाऱ्या मुक्त मानवाचा शोध घेण्याचा ओशोंचा प्रयत्न विशेष भावला असावा.

**पृष्ठे : १३६ ● किंमत : १०० रु. ● सभासदांना : ७५ रु. ● पोस्टेज : २० रु.**


दिवाळी अंकात वाचा


**विविध क्षेत्रातील व्यक्तींनी सांगितलेल्या अनुभवलेल्या गमती जमती**

गुलजार, व. कृ. जोशी, डॉ. आनंद यादव, डॉ. राजेंद्र प्रभुणे, रविंद्र पिंगे, सुवर्णा दिवेकर, डॉ. अनिल गांधी, दत्तप्रसाद दाभोळकर, रा. रं. बोराडे आणि इतर

**बालनगरीत - खास गोष्टी - राजीव तांबे**

शिवाय आगामी पुस्तकांची झलक
विविध स्पर्धा, कोडी, विनोद




# नॉस्त्रादेमसची भविष्यवाणी

## चारशे वर्षांपूर्वी केलेल्या भविष्यवाणीचा सातत्याने पडताळा येतो तेव्हा...

**डॉ. सुरेशचंद्र नाडकर्णी**

*''त्याचे काहीतरी जंगली नाव असेल...*
*तीन देवता भगिनी नियतींच्या इच्छेप्रमाणे त्याचे नाव ठेवतील...*
*आणि तो महान वक्ता खूप कर्तृत्व गाजवून*
*विश्वामध्ये नाव कीर्ती मिळवतील.''*

असे भविष्य भारताबद्दल नॉस्त्रादेमसने साडेचारशे वर्षांपूर्वी लिहून ठेवलेले आहे. हा नेता भारताला जगातील महासत्ता बनवील अशा आशयाच्या पाचसहा चारोळ्या (चतुष्पदी) आढळतात.

*हा नेता तीन जलराशींच्या प्रभावाखाली जन्मलेला असेल*
*तो गुरुवार हा सुटीचा दिवस म्हणून घोषित करील*
*भूमीवर तसेच सागरावर त्याची सत्ता पसरेल*
*पूर्वेला खूप नुकसान सोसावे लागेल (पहिले शतक - ५०)*

या नेत्याचे नाव शायरेन (शिरेन, क्रिशन, किरण) असे काहीतरी असेल. लोक त्याच्यावर प्रथम प्रेम करतील. नंतर त्याच्या सामर्थ्यामुळे त्याला घाबरतील. त्याची कीर्ती 'जगज्जेता' म्हणून स्वर्गातही पोचेल. (सहावे शतक - ७०)

*तो भयानक शस्त्रास्त्रे घेऊन पर्शियातून येईल*
*बाल्कन राष्ट्रे, ग्रीस, इटाली पादाक्रांत करील*
*या युद्धातील भयानक रक्तपातामुळे*
*ॲड्रिॲटिक (भूमध्य) समुद्र अतिरेक्यांच्या रक्ताने लाल होईल (पाचवे शतक - २७)*
*मध्यपूर्वेत बाबिलोनसन्मुख भूमीवर रक्ताचा सडा पडेल*
*जमीन, सागर, आकाश सर्वदूर हल्ले होतील*
*भयानक प्राणहानी, दैवी प्रकोप असे भासेल*
*सर्वत्र दुष्काळ, उपासमार आणि रोगांची साथ पसरेल (पहिले शतक - ५५)*

हे सर्व इ. स. २०२० ते २०२५ या दरम्यान होईल असे नॉस्त्रादेमस सूचित करतो. तिसरे महायुद्ध या काळात घडून, विश्ववंद्य अशा भारतीय नेत्याकडे जगाची सूत्रे जातील - हा आशावाद भारतीयांची अस्मिता आणि आत्मप्रतिष्ठा यांना उभारी देणारा आहे यात शंकाच नाही. त्यामुळेही साडेचारशे वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या नॉस्त्रादेमसच्या भविष्यवाणीबद्दल भारतीयांना विशेष प्रेम व आपुलकी वाटावी हे स्वाभाविकच आहे. आपला नाहीतरी भविष्यावर फारच विश्वास. कुंडली मांडूनच प्रत्येक गोष्ट करण्याची आपली मनोधारणा. त्यात नॉस्त्रादेमस हा फ्रेंच ज्यू. एखाद्या परदेशी माणसाने भारत महासत्ता होणार असे भविष्य वर्तवले तर आपल्याला त्याचे विशेषच अप्रूप वाटणार. आणि आता तर त्याच्या भविष्यवाणीची प्रचीती यायला अवघी वीस वर्षे उरलेली आहेत. त्यामुळे आपल्याला त्याविषयी विशेष उत्सुकता असणारच!

या भविष्यवाणीत दहाव्या शतकातील ९६ क्रमांकाची चारोळी सांगते की,

*सागराच्या नावाचा धर्म येईल*
*अदालुन कलिमच्या पुत्राला पराभूत करील*
*हट्टी आडमुठे आकाशातील पित्याचे पुत्र*
*आलिफ आणि अलिफ दुःखी आणि हतवीर्य होतील.*

यात सागर म्हणजे सिंधू व सिंधूपासून हिंदू आणि आकाशातील बापाचे म्हणजे ईश्वराचे पुत्र म्हणजे अतिरेकी अरब आणि चिनीलोक युद्धात पराभूत होतील, दुःखी होतील असे सूचित होते. हे कधी घडेल ? तर शनी आणि मंगळ या ग्रहांची युती होईल तेव्हा. कर्क राशीच्या स्वामीचे चिन्ह मिरवणाऱ्या फौजा पराभूत होऊन मागे वळतील आणि मग बराच काळ जगात शांतता नांदेल. ही शनी मंगळाची युती इ. स. २०२४ व २०२८ या वर्षी होणार आहे. त्यामुळे नॉस्त्रादेमसचे भविष्य पडताळून पाहण्याचा अवसर आपल्या आजच्या पिढीलाही लाभणार आहे. कर्क राशीचा स्वामी चंद्र. चंद्रकोरीचा ध्वज मिरवणारे मध्यपूर्वेतील अतिरेकी अरब सैन्य आणि त्यांचे साथीदार चिनी सैन्य यांच्याशी हा लढा होणार.

नॉस्त्रादेमसने या युद्धातून जगज्जेता नेता बनणारा माणूस हा भारताचा पंचनद्यांच्या परिसरातून येईल, तो रानटी श्वापदाचे नाव धारण करणारा असेल (सिंह, सिंग), मध्य आशियातील बेचिराख झालेल्या वाळवंटाऐवजी पराभूत सैन्य भारत - ब्रह्मदेशातून मायदेशाकडे जाण्याचा प्रयत्न करील तेव्हा हा भारतीय नेता त्यांचा पाठलाग करून त्यांना सळो की पळो करून सोडेल. ते उलटून गंगेच्या खोऱ्यात युद्ध पेटेल, असे तिसऱ्या शतकातील ५१ वी चारोळी सांगते. 'गंगा' हा शब्द त्याने स्पष्टपणे वापरलेला असल्याने ही गंगा भारतातीलच असणार असे गृहीत धरून असा काही अन्वयार्थ लावणे तर्कसंगत ठरते.

भारतीय म्हणून आपला आत्मसन्मान जागवणारे, चेतवणारे हे भविष्यकथन आपल्याला प्रिय व्हावे यात नवल नाही.

म्हणून नॉस्त्रादेमस हा आपल्याला आवडायला हरकत नाही.

तो कोण होता ? कधी होऊन गेला ?

मायकेल नॉस्त्रादेमसचा जन्म फ्रान्समध्ये झाला. त्यांच्या घराण्यात वंशपरंपरेने वनौषधी,





## हा नेता भारताला जगातील महासत्ता बनवील अशा आशयाच्या पाचसहा चारोळया (चतुष्पदी) आढळतात.

जडीबूटी, भविष्यकथन, वगैरे विद्या चालत आलेल्या होत्या. चौदाव्या शतकाच्या अखेरीस या भटक्या ज्यू टोळ्या स्पेनमधून यूरोपच्या वेगवेगळ्या देशांत स्थलांतरित झाल्या. नॉस्त्रादेमसचे आजोबा डॉ. पियरे हे प्रथम इटलीत व नंतर फ्रान्समध्ये स्थायिक झाले. तेथे ज्यू डॉक्टर व भविष्यवेत्ते डॉ. डीन यांच्याशी त्यांचा संपर्क आला. डॉ. पियरे यांनी आपला मुलगा जॅक्विस याच्यासाठी डॉ. डीन यांच्या रेनी या कन्येला मागणी घातली. जॅक्विस व रेनी या दांपत्याचा मायकेल नॉस्त्रादेमस हा पुत्र, 'हा जगातील महान भविष्यवेत्ता होईल' असे आजोबांच्या लक्षात आले. त्या दृष्टीने मायकेलचे संगोपन - शिक्षण सुरू झाले. त्याला पारंपरिक वनौषधी व भविष्यकथनाचे ज्ञान देण्यात आले. पुरातन दुर्मिळ ग्रंथही अभ्यासासाठी देण्यात आले.

नॉस्त्रादेमसने सेंच्युरीज नामक ग्रंथ लिहिला. त्यात चार चार ओळींच्या एक हजार चतुष्पदी आहेत. त्या दहा शतकात विभागण्यात आल्या आहेत. "मला या भविष्यातील घटना देवदूताने दाखवल्या. त्याने सांगितलेली पद्यमय वचने मी लिहून घेतली" असे तो म्हणतो.

परंतु देवदूताने सांगितलेली अनेक भाकिते इतकी भयंकर होती की ती जशाच्या तशी उघड केली तर आपलेच लोक आपल्यावर उलटतील, आपले शत्रू बनतील, भीषण भविष्याची कल्पनाही सहन करू शकणार नाहीत म्हणून यातील घटनाक्रम तारीखवार आणि नावानिशी कुणालाही उघडपणे कळू नये, अशी खबरदारी त्याने पुढे घेतली.

ॲव्हिना विद्यापीठातून तो १५२१ साली कलाशाखेचा पदवीधार झाला. पण त्याचे जास्त लक्ष ज्योतिषशास्त्र, गूढविद्या, खगोलशास्त्र याकडे होते. १५२५ साली त्याने वैद्यकशास्त्रातील पदवीही मिळवली. प्लेगच्या वेळी त्याने काही वनस्पतींची भुकटी अवतीभोवती उधळून, रुग्णांना गुलाबाच्या पाकळ्यांच्या व कलाकंदाच्या गोळ्या देऊन रुग्णांना बरे केले, तेव्हा इतर डॉक्टरांनी त्याच्यावर जादूटोणा करण्याचा आरोप ठेवून त्याची वैद्यकीय पदवी काढून घ्यावी अशी मागणी केली. तेव्हा नॉस्त्रादेमसने वैद्यकशास्त्रातील डॉक्टरेट (१५२९ मध्ये) मिळवून त्याने प्राध्यापकपदाचा राजीनामा दिला. त्यावेळी त्याला यूरोपमधील मान्यवर तत्त्वज्ञ स्कॅलिजर याने एजेन येथे येण्याचे आमंत्रण दिले. तेथेच त्याने वैद्यकीय व्यवसाय सुरू केला. लग्न केले. घर थाटले. फ्रान्समध्ये प्लेगची साथ आल्याचे कळतात तो रुग्णांच्या सेवेसाठी धावून गेला. तर इकडे त्याची पत्नी आणि मुले प्लेगमध्ये दगावली. स्वतःच्या पत्नीला न वाचवू शकणारा हा डॉक्टर इतरांना काय वाचवणार असा त्याच्याविरुद्ध प्रचार सुरू झाला. तेव्हा एजेन सोडून तो भटकंती करीत राहिला. ज्योतिषी व भविष्यवेत्ता म्हणून त्याची ख्याती सर्वदूर पसरत चालली, भविष्य जाणणाऱ्या काही अतींद्रिय शक्ती आपल्यात आहेत असा त्याला प्रत्यय येऊ लागला. १९५५ मध्ये 'प्रोफेनिक्स द मायकेल नॉस्त्रादेमस' ह्या नावाने त्याच्या भविष्यवाणीच्या

पुस्तकाचा पहिला भाग प्रसिद्ध झाला. त्यात चारशेपैकी कमी चतुष्पदी होत्या. त्यातील एका चतुष्पदीने फ्रान्समध्ये खळबळ उडाली.

*द्वंद्व युद्ध होईल, तरुण सिंह वृद्ध सिंहाला हरवील*
*वृद्ध सिंहाच्या शिरस्त्राणातून भाला आत घुसेल*
*एका डोक्याला व गळ्याला इजा होईल*
*काही दिवस यातना सोसून तो मरण पावेल*

हे भविष्य फ्रान्सचा राजा दुसरा हेन्री याच्या संदर्भात आहे असे सर्वांना वाटले. राणी कॅथरीनने नॉस्त्रादेमसला पॅरिसला बोलावून त्याबद्दल विचारले. त्याने 'जगात सारं काही घडतं ते नियतीमुळंच, त्यात कुणाला ढवळाढवळ करता येत नाही. नियती कुणीही बदलू शकत नाही. ग्रहगोलांच्या आणि दैवी शक्तीच्या मदतीनं जे लिहिलं गेलं, त्यात बदल कसा होणार?' असे सांगून त्याने तिची समजूत काढली. तिच्या राजपुत्रांच्या संदर्भात त्याने म्हटले, ''तुझ्या संततीच्या नशिबात मला चार राज्याभिषेक दिसतात.'' त्यामुळे ती खूष झाली. पुढे फ्रान्सच्या राजाचा भालायुद्धात मृत्यू झाला. त्यावेळी नॉस्त्रादेमस शेकडो मैल दूर सेलोनमध्ये होता. पॅरिसमध्ये त्याच्यावर लोक खवळले. सेलोनमध्येही त्याची प्रतिमा जाळण्यात आली. पण राणीच्या आदेशाने त्याला संरक्षण देण्यात आले. मात्र त्याच्या पुस्तकाच्या प्रती जोरात खपू लागल्या. १५६४ मध्ये राजमाता कॅथरीनने सेलोनला येऊन नॉस्त्रादेमसला राजवैद्य हा बहुमानचा किताब दिला. १ जुलै १५६६ रोजी त्याने चर्चच्या धर्मगुरूंना बोलावून कन्फेशन केले. सर्वांना धन्यवाद दिले. आपला शागीर्द डॉ. जीन शॉव्हिनी याला सांगितले, ''उद्या तू येशील तेव्हा मी नसेल...''

दुसऱ्या दिवशी सकाळी तो पलंगाजवळच्या बाकावर मृतावस्थेत आढळला. शेजारी कॅलेंडरच्या २ जुलैच्या पानावर एक चतुष्पदी होती,

*''तो बाहेर कुठेतरी जाऊन येईल*
*राजाने दिलेली भेटवस्तू खणात सुरक्षित ठेवील*
*त्यानंतर तो काहीच करणार नाही*
*त्याचा निष्प्राण देह पलंगाजवळच्या बाकावर आढळून येईल.''*

त्याने आपल्या अंत्यसंस्काराबद्दल काही सूचना केलेल्या होत्या.

त्याचे थडगे १७९२ मध्ये उखडण्यात आले. त्यात एक ताम्रपट आढळला. 'माझे थडगे उकरणारे दोघेही क्रांतिकारकांच्या भरकटलेल्या गोळ्यांचं लक्ष्य होऊन येथेच मरून पडतील - मायकेल (२ जुलै १५६६)

त्याच्या सेंच्युरीजमध्ये एक हजार चतुष्पदी आहेत.

त्याने त्यात वर्तविलेल्या भविष्यानुसार पुढे अनेक घटना घडल्या असे आढळून येते.

नेपोलिअन बोनापार्ट (१७६९-१८२१), ॲडाल्फ हिटलर, मुसोलिनी, डॉ. गोबेल्स, दुसरे महायुद्ध, नागासाकी-हिरोशिमावरील बाँबवर्षाव, इस्राइलची निर्मिती, खोमेनीचा उदय आणि अस्त, डायनाचा दुर्दैवी अंत, अठराशे सत्तावनचे स्वातंत्र्ययुद्ध, झाशीची राणी, सुभाषचंद्र बोस





## जगाचा इतिहास घडवणाऱ्या अनेक घटनांचे संकेत चारशे वर्षांपूर्वी नॉस्त्रादेमसने आपल्या भविष्यवाणीत दिले आहेत.

आणि आझाद हिंद सेना, भारताचे स्वातंत्र्य, जवाहरलालजींचे नेतृत्व, इंदिरा गांधी, पायलट वारस - राजीव गांधी यांची हत्या (कोळशाच्या स्त्रीने राजपुत्राविरुद्ध केलेला कट), नव्या शहरातील जुळे मनोरे कोसळून होणारा हाहाकार, रशियातील राज्यक्रांती, अरब हुकुमशहा व मुस्लिम दहशतवाद, जैविक युद्ध (इ. स. २००९) अरब व चिनी सैन्य यांचा भूमध्य समुद्रात पाश्चात्य राष्ट्रांकडून होणारा पराभव (इ. स. २००५ ते २०१७) अशा अनेक घटनांचे संकेत चारशे वर्षांपूर्वी नॉस्त्रादेमसने आपल्या भविष्यवाणीत दिले आहेत.

*पृथ्वी हादरविणाऱ्या ज्वाला जमिनीवर पडलेल्या*
*ढिगाऱ्यातून उफाळतील, धुमसत राहतील*
*नव्या शहरातील जुळे मनोरे कोसळतील*
*खूप रेंगाळणारे युद्ध सुरू होईल. (५७०)*

यासारखी चतुष्पदी नक्कीच आपल्याला चक्रावून सोडते. अशा अनेक चतुष्पदींचा पडताळा घेता येतो.

म्हणून नॉस्त्रादेमसच्या भविष्यवाणीबद्दलचे कुतूहलही कायम राहते.

**पृष्ठे : १३२ ● किंमत :८० रु. ● सभासदांना : ६० रु. ● पोस्टेज : २० रु.**


## - आश्चर्यकारक, मनोरंजक उत्कंठावर्धक पुस्तके -



| | | |
|---|---|---|
| देव ? छे! परग्रहावरील अंतराळवीर | बाळ भागवत | १०० रु. |
| पृथ्वीवर माणूस उपराच! | डॉ. सुरेशचंद्र नाडकर्णी | ७० रु. |
| अज्ञाताचे विज्ञान | डॉ. सुरेशचंद्र नाडकर्णी | १३० रु. |
| व्हर्च्युअल रिॲलिटी | डॉ. बाळ फोंडके | १५० रु. |
| विज्ञान विशेष | डॉ. बाळ फोंडके | ११० रु. |
| खिडकीलाही डोळे असतात | डॉ. बाळ फोंडके | ११० रु. |
| नामशेष झालेले प्राणी | डॉ. किशोर पवार | ५० रु. |
| सागरातील नवलाई | डॉ. किशोर पवार | ८० रु. |
| विकरांचे विश्व (अनुवाद) | डॉ. प्रमोद जोगळेकर | ६० रु. |
| संभव-असंभव (अनुवाद) | डॉ. प्रमोद जोगळेकर | ८० रु. |

# पुरस्कार

## ❒डॉ. आनंद यादव यांना मृत्युंजय पुरस्कार

मृत्युंजयकार शिवाजी सावंत यांच्या स्मृतीप्रित्यर्थ मृत्युंजय प्रतिष्ठानची स्थापना करणत आली. ३१ ऑगस्ट रोजी शिवाजीरावांच्या जयंतीचा तर १८ सप्टेंबर रोजी पहिल्या पुण्यतिथी दिनाचा कार्यक्रम झाला. प्रतिष्ठानचे औपचारिक उद्‌घाटन, मृत्युंजयकारांवरील वेबसाईटचे उद्‌घाटन आणि प्राचार्य शिवाजीराव भोसले यांच्या व्याख्यानाचा कार्यक्रम १८ रोजी पुण्यात झाला. प्रतिष्ठानच्या वतीने या वर्षीपासून मराठीतील प्रतिभावंत साहित्यिकास शिवाजीरावांच्या नावे पुरस्कार देण्यास सुरूवात झाली आहे. मृत्युंजय पुरस्काराचा पहिला सन्मान डॉ. आनंद यादव यांना प्राप्त झाला आहे. ११ हजार रु. रोख, स्मृतीचिन्ह असे त्याचे स्वरूप आहे. प्रतिष्ठानचे अध्यक्ष शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

## ❒ पं. नारायण भानोसे यांना महाकवी कालिदास संस्कृत साधना पुरस्कार

पंच्याहत्तर वर्षांपासून वेद वाङ्‌मयाच्या सेवेस वाहून घेतलेल्या पं. नारायण विनायक भानोसे यांना राज्य शासनातर्फे १२ ऑगस्ट रोजी संस्कृत दिनाचे औचित्य साधून 'महाकवी कालिदास संस्कृत साधना पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले.

पं. भानोसे यांचा जन्म १४ ऑगस्ट १९२० रोजी नाशिकला झाला. त्यांनी २६ व्या वर्षापर्यंत वेदशास्त्रसंपन्न पं. जगन्नाथ गर्गे, महामहोपाध्याय श्रीधर वारे, गोपाळशास्त्री पुराणिक आदींच्या सानिध्यात शुक्ल यजुर्वेद, शतपत ब्राम्हण, श्रौत-स्मार्त कर्मकांड अशा वेदशास्त्राचे सांगोपांग शिक्षण घेतले. यज्ञ-यागाचे प्रात्यक्षिक ज्ञानही ठिकठिकाणी जाऊन मिळविले.

दिल्ली येथील वेद संमेलनाच्यावेळी नाट्य अकादमीने वेदातल्या विशिष्ट मंत्रांच्या रेकॉर्डिंगसाठी १४०० जणांमधून पं. भानोसे यांची निवड केली होती. त्यांचे बहुतेक शिष्य पौरोहित्य क्षेत्रात चमकले असून आज वयाच्या ८३ व्या वर्षीही पं. भानोसे वेद-श्रौत स्मार्ताचे विनामूल्य प्रशिक्षण देत आहेत. त्यांना कांची कामकोटी शंकराचार्य प्रतिष्ठानद्वारे सध्या दरमहा निवृत्तीवेतन दिले जाते.

## ❒ वसंत पळशीकर यांना भालेराव पुरस्कार

अनंत भालेराव स्मृती पुरस्कारासाठी यंदा महाराष्ट्रातील ज्येष्ठ पत्रकार वसंत पळशीकर यांची निवड झाली आहे. २ नोव्हेंबर रोजी औरंगाबाद येथे त्यांना हा अकरा हजार रुपयांचा पुरस्कार देण्यात येईल.

## ❒ मधुकर तोरडमल यांचा बहुमान

अभिनेते, नाटककार, दिग्दर्शक आणि निर्माते अशा चतुर्विध भूमिकांमुळे मराठी नाट्यरसिकांच्या मनात स्वत:चे खास स्थान निर्माण केलेले ज्येष्ठ रंगकर्मी प्रा. मधुकर तोरडमल यांना यंदाचा



विष्णुदास भावे पुरस्कार जाहीर झाला असून, त्यामुळे त्यांच्या मुकुटात आणखी एक रत्नखचित तुरा खोवला गेला आहे. 'तरुण तुर्क म्हातारे अर्क' या सदाबहार विनोदी नाटकातील प्रा. बारटक्के यांची भूमिका कसदार अभिनयामुळे त्यांनी अजरामर केली, पण 'प्राध्यापकमजकुरां'च्या 'ह' च्या भाषेची रंगमंचावर मनमुराद उधळण करून त्यांनी या भाषेला वेगळे परिमाण मिळवून दिले. या नाटकाचे बाराशेहून अधिक प्रयोग झाले आणि दर वेळी ते तेवढ्याच; किंबहुना पूर्वीच्या प्रयोगांपेक्षाही अधिक पटीने रंगत गेले. विष्णुदास भावे पुरस्कारामुळे त्यांच्या अभिनयगुणांचा गौरव झाला आहे; तसाच त्यांनी नाट्य क्षेत्रातील सवंग आणि गैर गोष्टींविरुद्ध उपस्थित केलेल्या मुद्द्यांनाही व्यापक आधार लाभला आहे.

## ❒ महाकवी कालिदास संस्कृतसाधना पुरस्कार

बत्तीसाव्या संस्कृत दिवस समारंभात राज्याचे उच्च शिक्षणमंत्री लक्ष्मणराव ढोबळे यांच्या हस्ते संस्कृतचा प्रचार व प्रसार करणाऱ्या आठ पंडितांना महाकवी कालिदास संस्कृतसाधना पुरस्कार प्रदान करण्यात आले.

श्री. ढोबळे म्हणाले, '' आपल्या संतांनी समाजाला जागे करण्यासाठी आयुष्याचे योगदान दिल्याचे आपल्याला संस्कृतमुळे समजले. स्वातंत्र्याची तरलताही संस्कृतमुळेच टिकून आहे.''

रोख पंचवीस हजार रुपये, सन्मानपत्र, शाल, श्रीफळ अशा रूपात पुरस्कार देण्यात आले. पुरस्कारप्राप्त पंडितांचा सपत्नीक सत्कारही झाला. त्यामध्ये काशिराव तुकाराम शिरसाठ (अकोला), नारायण विनायक भानोसे (नाशिक), सूर्यकांत शंकर होनमुटे (करकंब-पंढरपूर), वसंत अनंत गाडगीळ (पुणे), पुरुषोत्तम प्रल्हाद मुळे (नागपूर), प्रा. रमेश विठ्ठल खेर (मुंबई), डॉ. सीताराम नारायण जोशी (नांदेड) यांचा समावेश होता.

## ❒ ना. धों. महानोर यांना महादेवशास्त्री जोशी पुरस्कार

गोमंतक मराठी अकादमीतर्फे देण्यात येणारा पंडित महादेवशास्त्री जोशी गौरव पुरस्कार कविवर्य ना. धों. महानोर यांना प्रदान केला. मराठी साहित्यात कवितेच्या क्षेत्रात श्रेष्ठ दर्जाचे महत्त्वपूर्ण लिखाण केल्याबद्दल हा पुरस्कार आहे. पुरस्कार वितरण पणजी येथे गोव्याचे राज्यपाल केदारनाथ साहनी यांच्या हस्ते झाले.

## ❒ प्रा. फ. मुं. शिंदे यांना गदिमा काव्यप्रतिभा पुरस्कार

महाराष्ट्र कामगार साहित्य परिषदेच्या वतीने देण्यात येणारा यंदाचा 'गदिमा काव्यप्रतिभा पुरस्कार' कवी प्रा. फ. मुं. शिंदे यांना, तर 'गदिमा कला पुरस्कार' लावणी कलाकार सुरेखा पुणेकर यांना जाहीर करण्यात आला आहे, असे परिषदेचे अध्यक्ष पुरुषोत्तम सदाफुले यांनी सांगितले.

''एसकेएफ न्यू एम्प्लॉईज हौसिंग सोसायटीला 'गदिमा स्नेहबंध पुरस्कार' तर कीर्तिश्री सांस्कृतिक कला केंद्रास 'गदिमा रंगयात्री पुरस्कार' देण्यात आला.

'गदिमा साहित्य पुरस्कारा'साठी प्रमोद नवलकर, शंकर भोसले (मुंबई, नवलाई), प्रकाश पठारे (पुणे, हास्यसरिता), प्रा. विमल वाणी (जळगाव, रानजाई), हेमा लेले (पुणे, क्षण अस्तित्वाचे), मन्मथ बेलुरे (उस्मानाबाद, पाझर) यांची निवड करण्यात आली. तसेच कविता महोत्सवानिमित्त राज्यभरातून आलेल्या ३९२ कवितांमधून निवडक ३७ कवींना कवितावाचनासाठी निमंत्रित करण्यात आले आहे. त्यातील सात यशस्वी कवींना 'गदिमा काव्य पारितोषिक' देण्यात येणार आहे.

## दीपावली निमित्त खास योजना

त्रिदल योजना

# तीन पुस्तके घ्या व त्यातील एक मोफत मिळवा

दिवाळी हा आनंदाचा,प्रकाशाचा सण. प्रकाशपूजेसाठी ज्ञानयज्ञ हवा आणि ज्ञानयज्ञासाठी हवीत पुस्तके.
यासाठीच आम्ही सिद्ध आहोत.
खालील यादीतील आपल्या पसंतीची तीन वेगवेगळी पुस्तके निवडा आणि त्यातील सर्वात कमी किंमतीचे पुस्तक **चक्क मोफत** मिळवा.

**मुदत फक्त ३० नोव्हेंबर २००३ पर्यंतच.**

### रणजित देसाई

| | |
|---|---|
| स्वामी | १४०/- |
| माझा गाव | १५०/- |
| प्रतिक्षा | ८०/- |
| मधुमती | ८०/- |
| कातळ | ९०/- |
| मेख मोगरी | ६०/- |
| श्रीमानयोगी (नाटक) | ४०/- |
| सावली उन्हाची (नाटक) | ५०/- |
| स्नेहधारा | ९०/- |

### वि. स. खांडेकर

| | |
|---|---|
| जळलेला मोहोर | १००/- |
| विद्युतप्रकाश | २५/- |
| स्वप्न आणि सत्य | ७०/- |
| भाऊबीज | १२०/- |
| प्रीतीचा शोध | १५०/- |
| मध्यरात्र | ४०/- |
| क्षितिजस्पर्श | ८०/- |
| सुवर्णकण (खलिल जिब्रान) | ८०/- |
| हिरवळ | ५०/- |
| अविनाश | ५०/- |
| रेषा आणि रंग | १२५/- |
| सहा भाषणे | ७०/- |
| इंद्रधनुष्य | ५०/- |
| तारका | ४०/- |



### आनंद यादव

| | |
|---|---|
| झोंबी | २५०/- |
| माऊली | ६०/- |
| माळावरची मैना | ११०/- |
| उगवती मने | १००/- |
| पाणभवरे | १२५/- |
| साहित्याची निर्मिती प्रक्रिया | १३०/- |

### व. पु. काळे

| | |
|---|---|
| चिअर्स | १००/- |
| फॅण्टसी एक प्रेयसी | ९०/- |
| बाई बायको कॅलेंडर | १००/- |
| वन फॉर द रोड | १००/- |

### ओशो

| | |
|---|---|
| एक एक पाऊल | ८०/- |
| नवी पहाट | १००/- |
| विद्रोही | १२०/- |

### वि. स. वाळिंबे

| | |
|---|---|
| फसलेला क्षण (अनु.) | ४०/- |
| कथा ही दिवावादळाची | १००/- |
| जयहिंद आझाद हिंद | १००/- |
| वॉर्सा ते हिरोशिमा | ३००/- |

### तसलिमा नासरिन

| | |
|---|---|
| लज्जा | १२५/- |
| नष्ट मेयेर नष्ट गद्य | १२०/- |

### शान्ता शेळके

| | |
|---|---|
| त्रिवेणी : गुलजार (अनु.) | ६०/- |
| मेघदूत (अनु.) | ८०/- |
| सांगावेसे वाटले म्हणून.... | ९०/- |
| रंगरेषा | ८०/- |

### किरण बेदी

| | |
|---|---|
| इट्स ऑलवेज पॉसिबल | २५०/- |
| मजल दरमजल | ८०/- |

### उमा कुलकर्णी

| | |
|---|---|
| परिशोध : एस. एल. भैरप्पा | १००/- |
| डोंगराएवढा : शिवराम कारंत | ९०/- |
| अंतराळ : शांतिनाथ देसाई | १००/- |

### माधवी देसाई

| | |
|---|---|
| हरवलेल्या वाटा | ८०/- |
| सागर | ६०/- |
| धुमारे | ७०/- |

### अंजनी नरवणे

| | |
|---|---|
| वडवाई | २००/- |
| गहाण पजलेली टेकडी | १२०/- |
| आपण आणि आपले ताणतणाव | १००/- |

### निरंजन घाटे

| | |
|---|---|
| वेध पर्यावरणाचा | १५०/- |
| जिज्ञासापूर्ती | १५०/- |
| विज्ञानाचे शतक | २००/- |
| तंत्रज्ञानाचे विश्व - माहिती प्रसार साधने, दळणवळण/वाहतूक | २०/- |
| संगणक, यंत्रमानव | २०/- |
| मानवी युद्धसाधने लेझर्स | २०/- |

### इतर लेखकांची

| | |
|---|---|
| द गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज : अरुंधती रॉय | ३००/- |
| ब्लास्फेमी : तेहमिना दुर्रानी | १५०/- |
| डायरी ऑफ अॅन फ्रँक : अॅन फ्रँक | १७५/- |

द फिस्ट ऑफ गॉड :
फ्रेडरिक फोरसीथ ३००/-
डॉ. झिवागो : बोरिस पास्तरनाक २५०/-
अणसार : वर्षा अडालजा १८०/-
द हॉट झोन : रिचर्ड प्रेस्टन २००/-
ज्युरॅसिक पार्क : मायकेल क्रायटन २५०/-
द लॉस्ट वर्ल्ड : मायकेल क्रायटन २२०/-
३००१ द फायनल ओडिसी :
आर्थर सी. क्लार्क १६०/-
डिफिकल्ट डॉटर्स : मंजू कपूर २००/-
एकदाच अशी रात्र येते :
रॉजर डॉनलॉन ७०/-
मंदिरा : सुनील गंगोपाध्याय १२५/-
टोकियोच्या नभांगणातील
चमकत्या तारका १८०/-
मुंबई...मुंबई ! : विक्रम चंद्र १५०/-
द्वंद्व : विजयदान देथा १५०/-
फुलांचे बोल : आन्ना साक्से १००/-
पूजाघर : प्रतिभा राय ८०/-
कथांतर १२०/-
इंटरप्रिटर ऑफ मॅलडीज् :
झुंपा लाहिरी १७०/-
फक्त खेळण्यासाठी ६०/-
विश्वातील सजीवसृष्टी ६०/-
चला प्रयोग करू या !
उर्जा २०/-
उष्णता २०/-
अन्न २०/-
परिस्थितीशास्त्र २०/-
रसायने २०/-
हवा २०/-
पदार्थ २०/-
अवकाश २०/-
हवास्थिती २०/-
गती : चलन २०/-
ध्वनी २०/-
मोजमापे २०/-
जनूक मोहिम : सुकन्या दत्ता ६०/-
हिरवे जनूक : शकुंतला भट्टाचार्य ६०/-
संभव असंभव ८०/-
विकरांचे विश्व ६०/-
मानवगाथा एक शोधनिबंध १६०/-
शरीरातील विविध संस्था
फुफ्फुसे, हृदय, मेंदू २५/-
अंत:स्त्राव, गर्भाशय, जठर २५/-
स्नायू, अस्थि २५/-
सेंट्रल बस स्टेशन १००/-
संचित ५०/-
चितेवरच्या कळ्या १३०/-
पुर्णिया ५०/-
धर्मयुद्ध २५०/-
फॅक्टरी गेट १५०/-
भंडारभोग १५०/-
मोराचे पाय १००/-
गाजव्यथा १००/-
शापित राजहंस २५०/-
मुक्तिशोध यात्रा १७०/-
मालनगाथा : भाग २ २००/-
जागल्या ५०/-
पैलू १४०/-
तळ्यात मळ्यात १२०/-
शेलका साज १२०/-
आनंदाचे अंतरंग : मदर तेरेसा ७५/-
कोकण ८०/-
स्मरण-विस्मरण १२५/-
उद्याच्या सुंदर दिवसासाठी १००/-
सुखशांतीच्या शोधात १००/-
बंजाऱ्याचे घर १५०/-



धागे : गुलजार ६०/-
हिमकोंदणातील हिरा ८०/-
कारगिलनामा १६०/-
गजल १८०/-
एकवचनी ३५०/-
शिलंगणाचं सोनं २५०/-
ख्यातनाम इतिहासकार :
अरुण शौरी १५०/-
द अदर साईड ऑफ सायलेन्स :
उर्वशी बुटालिया २५०/-
चाकाची खुर्ची १८०/-
रेशीमगाठी १००/-
बिझिनेस लेजंड्स : गीता पिरामल ३००/-
व्यथित मनानं सांगावसं वाटतं की १००/-
डायना आणि चार्ल्स १३०/-
भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील स्त्रिया :
नवाझ मोदी ३००/-
स्वप्नाकडून सत्याकडे
(कल्पना चावलाची कहाणी) ४०/-
सिलेक्टिव्ह मेमरी : शोभा डे ३३०/-
वीरप्पन : सुनाद रघुराम २२०/-
चेहऱ्यामागचे चेहरे १५०/-
सुंदर आपली फुलबाग ९०/-
घरातील बाग १००/-
A Methodical English Grammer 130/-
परित्यक्ता ७०/-
विटाळ ७०/-
देव! छे! परग्रहावरील अंतराळवीर १००/-
अज्ञाताचे विज्ञान (विज्ञान) १३०/-
व्हर्च्युअल रिॲलिटी (विज्ञान) १५०/-
रिवणावायली मुंगी १३०/-
कावळे आणि माणसं १००/-
शिवार १००/-
सांजवा ८०/-
उत्तरार्ध १३०/-
ऋतूवेगळे ७०/-
खसखशीचा मळा ७५/-
शेष-अवशेष १२५/-
लोलक १००/-
गॉरगोनाईज ५०/-
कातरवेळ ७०/-
पर्याय शब्दकोश ३००/-
पाणी कुठंवर आलं गं बाई... २५/-
कॉम्प्युटरच्या करामती ५०/-
ही सुट्टी कशी घालवाल ? ४२/-
शिवणकला एक छंद : स्मॉकींग १००/-
निरामय यशासाठी ध्यान ७०/-
मनावर विजय : एकनाथ ईश्वरन् १२५/-
चिंतामुक्त जीवन १६०/-
मुलांवरचे संस्कार ८०/-
असे बना अन् बनवा विद्यार्थी १००/-
बाळाचे आरोग्य ५०/-
भारत वैद्यक ६००/-
कर्करोग असाध्या नाही :
ए. एन. भिसे ५०/-
रेकी ६०/-
अस्त १५/-
नको स्वातंत्र्य स्त्रीला ५०/-
कुणीकडून कुणीकडे ४०/-
जेथे गवतास भाले फुटतात! ६०/-
मराठीचे व्याकरण २२५/-
मराठी व्याकरण परिचय ८०/-
मराठी निबंध ज्योती ८०/-
कुसुमाग्रज / शिरवाडकर एक शोध ७०/-
वाङ्मयेतिहास : सद्यस्थिती आणि
अपेक्षा २००/-
निवडक 'भाषा आणि जीवन' २००/-
उपयोजित समीक्षा : लक्षणे
आणि पडताळणी १२०/-

# श्रद्धांजली

### ❒ संस्कृतपंडित वि. बा. इनामदार

शिक्षणतज्ज्ञ आणि संस्कृतचे व्यासंगी अभ्यासक प्रा. डॉ. वि. बा. इनामदार (वय ८३) यांचे सांगली हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले.

सांगली जिल्ह्यातील खानापूर तालुक्यातील कार्वे हे डॉ. इनामदार यांचे गाव. ते सांगलीतील सिटी हायस्कूल आणि विलिंग्डन महाविद्यालयाचे विद्यार्थी होते. संस्कृतमध्ये त्यांनी डॉक्टरेट मिळविली होती. इंग्रजी भाषेवरही त्यांचे प्रभुत्व होते. उत्तम भाषावैभव लाभलेल्या डॉ. इनामदार यांचे वक्तृत्व वैशिष्ट्यपूर्ण होते. सांगलीतील वुईमेन्स एज्युकेशन संस्थेचे ते अध्यक्ष होते. कऱ्हाड येथील शिक्षण मंडळाचे पदाधिकारी म्हणूनही त्यांनी काम केले. मिरजेतील कन्या महाविद्यालय आणि अंबाबाई तालीम संस्थेचे ते पदाधिकारी होते. विद्यापीठातील विधिसभा आणि विविध अभ्यास मंडळांचे सदस्य म्हणून त्यांनी काम केले. सांगलीत संस्कृतसंवर्धन मंडळ उभारण्यात त्यांचा पुढाकार होता.

### ❒ कला इतिहास संशोधक समिता गुप्ता

प्रसिद्ध कला इतिहासकार डॉ. समिता गुप्ता (वय ६२) यांचे ७ ऑगस्ट रोजी पुणे येथे दीर्घ आजाराने निधन झाले.

मराठा व ब्रिटिश साम्राज्य, त्या काळातील वास्तुरचनाशास्त्र, कला; तसेच नगररचना यांच्या इतिहासाच्या अभ्यासासाठी डॉ. गुप्ता प्रसिद्ध होत्या. पुण्याची परंपरा व इतिहास यांबद्दल त्यांनी अनेक पुस्तकेही लिहिली. 'आर्किटेक्चर अँड राज-वेस्टर्न डेक्कन १७००-१९००', 'ग्लास पेंटिंग', 'पुणे-क्वीन ऑफ डेक्कन' ही त्यांची पुस्तके विशेष प्रसिद्ध होती. पुणे, सातारा आणि कोल्हापूर या मराठा साम्राज्यातील राजधान्यांवरील अभ्यासासाठी भारतीय ऐतिहासिक संशोधन परिषदेने (आयसीएचआर) त्यांना शिष्यवृत्ती दिली होती. त्यावर त्यांनी 'मराठा कॅपिटल' हे पुस्तक लिहिले आहे.

डॉ. गुप्ता या मूळच्या बंगालच्या. त्यांचे शिक्षण कोलकत्यात झाले. १९८३ मध्ये त्यांनी पुणे विद्यापीठातून 'कलोनिअल आर्किटेक्चर' या विषयावर पीएच. डी. केली. पुण्यातच त्या नौरोसजी वाडिया महाविद्यालयात दाखल झाल्या. पुण्यातील विविध ऐतिहासिक ठिकाणांवर त्या लेखन करीत होत्या. पुण्याच्या 'परंपरा व वारसा' (हेरिटेज) नकाशा तयार करण्यात त्यांनी पुढाकार घेतला होता. हा नकाशा लवकरच प्रसिद्ध होणार आहे.



# अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघ वार्ता

## उत्कृष्ट पुस्तकनिर्मितीसाठी विविध पुरस्कार

पुस्तक प्रकाशनाच्या प्रक्रियेत 'निर्मिती' हा महत्त्वाचा घटक असतो. 'पुस्तकनिर्मिती' ही संकल्पना केवळ 'मजकुराची छपाई' एवढीच मर्यादित राहत नाही. प्रकाशकाने विषयानुरूप पुस्तकाची मांडणी कलात्मकतेने व सर्जनशीलतेने करणे अपेक्षित असते. अनेक प्रकाशक या सर्जशशीलतेची प्रचीती विविध पुस्तकांच्या निर्मितीतून दाखवीत आले आहेत.

पुस्तकाच्या लेखनासाठी अनेक पुरस्कार दिले जातात. मात्र निर्मितीसाठी प्रकाशक घेत असलेल्या श्रमाचे, दाखवीत असलेल्या कल्पकतेची फारशी दखल घेतली जात नाही. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन 'अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघा'तर्फे या वर्षापासून विविध प्रकारच्या मराठी पुस्तकांसाठी पुरस्कार देण्यात येणार आहेत. पुस्तकनिर्मितीसाठी इतक्या मोठ्या प्रमाणावर पुरस्कार देण्याचा हा पहिलाच उपक्रम आहे.

हे पुरस्कार १ एप्रिल २००२ ते ३१ मार्च २००३ या दरम्यान प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांसाठी असतील.

**विविध पुरस्कारांसाठी पुस्तकांची वर्गवारी पुढीलप्रमाणे असेल.**

प्रकार १ :- **ललित साहित्य** *(प्रथम व द्वितीय असे दोन पुरस्कार)*
कथा, कादंबरी, कवितासंग्रह, ललित लेख, व्यक्तिचित्रण, विनोदी लेखन, नाटक, प्रवासवर्णन इ.

प्रकार २ :- **ललितेतर साहित्य** *(प्रथम व द्वितीय असे दोन पुरस्कार)*
समीक्षा, चरित्र, आत्मचरित्र, इतिहासविषयक, सामाजिकशास्त्रे इ.

प्रकार ३ :- **संदर्भग्रंथ** *(एक पुरस्कार)*
संदर्भकोश, ज्ञानकोश, शब्दकोश इ. कोश वाङ्मय

प्रकार ४ :- **उपयुक्त व छंदविषयक** *(प्रथम व द्वितीय असे दोन पुरस्कार)*
घरगुती उपयुक्त, आरोग्यविषयक, पाककृती, विणकाम, हस्तकला इ.

प्रकार ५ :- **कलाविषयक** *(एक पुरस्कार)*
संगीत, नाटक, नृत्य, चित्रकला तसेच चित्रपट इ. दृष्यकलांना वाहिलेली पुस्तके

** हा पुरस्कार दर दोन वर्षांनी दिला जाईल*

*** पहिला पुरस्कार २००३ साली म्हणजे यावर्षी दिला जाईल.*

प्रकार ६ :- **विज्ञानविषयक** *(एक पुरस्कार)*
वैज्ञानिक व शास्त्रीय विषयांना वाहिलेली पुस्तके.
** हा पुरस्कार दर दोन वर्षांनी दिला जाईल*
*** पहिला पुरस्कार २००४ साली दिला जाईल.*

प्रकार ७ :- **शिशुसाहित्य** (वयोगट : १ ते ७ वर्षे) *(एक पुरस्कार)*
चित्रांची पुस्तके, बडबडगीते, बालगीते, गोष्टी इ.

प्रकार ८ :- **बालसाहित्य** (वयोगट : ८ ते १२ वर्षे) *(एक पुरस्कार)*
गोष्टी, गीत-कविता, चरित्र, माहितीपट, विज्ञान इ.

प्रकार ९ :- **कुमारसाहित्य** (वयोगट : १३ ते १६ वर्षे) *(एक पुरस्कार)*
चरित्र, माहितीपर, विज्ञान, कथा, कादंबरी इ.

**मुखपृष्ठ व चित्रांसाठी पुरस्कार :**

मुखपृष्ठ :- (अ) सर्व प्रौढ वाङ्मयासाठी मिळून मुखपृष्ठांसाठी प्रथम व द्वितीय असे दोन पुरस्कार
(ब) सर्व शिशु-बाल-कुमार साहित्यांसाठी मिळून मुखपृष्ठांसाठी प्रथम व द्वितीय असे दोन पुरस्कार

**बोधचित्रांसाठी (इलस्ट्रेशन्स) :-** पुस्तकांतील चित्रांसाठी प्रथम व द्वितीय असे दोन पुरस्कार

**जाहिराती व ग्रंथप्रचार साहित्य यासाठी :**

पुस्तकांचा प्रसार, प्रचार यासाठीच्या विविध प्रकारच्या (ग्रंथसूची, माहितीपत्रके इ.) साहित्यासाठी, सर्व प्रकारच्या पुस्तकांच्या जाहिरातींसाठी मिळून एक पुरस्कार

इच्छुक प्रकाशकांनी, त्यांना योग्य वाटतील अशा पुस्तकांची प्रत्येकी एक प्रत व जाहिरात / प्रचारसाहित्य इ. चे नमुने पुढील पत्त्यावर **१० ऑक्टोबर २००३** पर्यंत पोचतील अशा रितीने पाठवावेत.

*श्री. प्रदीप चंपानेरकर*
*संयोजक, ग्रंथनिर्मिती पुरस्कार*
*द्वारा, रोहन प्रकाशन*
*पहिला मजला, आनंदी-श्रीपाद, ३९६-ब नारायण पेठ,*
*पत्र्या मारुती चौक, पुणे ४११ ०३०.*

पुस्तकांसोबत प्रवेशपत्रिकाही भरून पाठवायची आहे. माहिती-पत्रक व प्रवेश-पत्रिका सर्व प्रकाशकांना टपालाने पाठविली जाईल. न मिळाल्यास ती वरील पत्त्यावरून सोमवार ते शनिवारी दुपारी ३ ते ५ दरम्यान मागवून घ्यावी.

पुरस्कारनिवडीसाठी तज्ज्ञांची स्वतंत्र समिती नेमण्यात आली आहे. पुरस्कार, मानचिन्ह व प्रशस्तिपत्र या स्वरूपात पुरस्कार देण्यात येतील. पुरस्कार वितरण राष्ट्रीय पुस्तक-सप्ताहाच्या दरम्यान करण्याचा मानस आहे.



# मेहता मराठी ग्रंथजगत


◆ सप्टेंबर २००३
◆ वर्ष तिसरे
◆ अंक नववा


*— अनुक्रमणिका —*


| | |
|---|---|
| **संपादकीय** - | २ |
| **साहित्यवार्ता** | ५ |
| **पुस्तक परिचय** | |
| सांजवात : वि. स. खांडेकर | २२ |
| शिवणकला : एक छंद सलवार कमीज, स्कर्ट-ब्लाऊज, इव्हिनिंग गाऊन्स, मिडी | २८ |
| प्रेममयी : व. पु. काळे | ३१ |
| नॉस्त्रादेमसची भविष्यवाणी : डॉ. सुरेशचंद्र नाडकर्णी | ३५ |
| **पुरस्कार** | ४० |
| **श्रद्धांजली** | ४६ |



संपादक : सुनील मेहता

कार्यकारी संपादक : शंकर सारडा

संपादन सहाय्य : सुनीता दांडेकर

अंकाची किंमत १५ रु.

वार्षिक वर्गणी मनीऑर्डरने पाठवावी.

प्रसिद्धी दरमहा १५ तारखेस

मांडणी-अक्षरजुळणी : ***मेहता पब्लिशिंग हाऊस***



संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१२१६ सदाशिव पेठ,धनश्री अपार्टमेंटस्, पुणे-३०.
फोन : ४४७६९२४ फॅक्स : ०२०-४४७५४६२
**Email - mehpubl@vsnl.com**


**वार्षिक वर्गणी १०० रु. तीन वर्षाची २००रु. पाच वर्षांची ३००रु.**
**३ व पाच वर्षासाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**

*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*